सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

Bridge-Course

इयत्ता-नववी

विषय - मराठी

(द्वितीय भाषा)

अक्षरभारती

शैक्षणिक वर्ष २०२१-२२



ज्ञानसेवा तु साफल्यम्



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू अभ्यास (ब्रीज कोर्स) : इयत्ता नववी

- प्रवर्तक : शालेय शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- प्रेरणा : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.
- मार्गदर्शक : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे.
  मा.राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई.
- संपादक : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- सहसंपादक : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- कार्यकारी संपादक : **डॉ.कमलादेवी आवटे**,
  उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  श्रीमती नीता जाधव,
  उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे.
- संपादन सहाय्य : **डॉ.नंदा भोर, श्रीमती अश्विनी नरवणे,**
  विषय सहायक, मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- निर्मिती गटप्रमुख : **श्रीमती नम्रता शेजाळ**, अधिव्याख्याता, डायट रत्नागिरी.
- निर्मिती सदस्य : **१) श्री.देविदास गोसावी,** विषय सहायक,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,बुलडाणा
  २) श्रीम.सुषमा तगारे, सहायक शिक्षिका, शिक्षण प्रसारक मंडळी, इंग्लिश मिडीयम स्कूल,निगडी,पुणे.
  ३) डॉ.हरी कोकरे, सहायक शिक्षक, राजे संभाजी भोसले सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,औरंगाबाद.
  ४) श्री.द्वारकानाथ जोशी, सहायक शिक्षक, सरस्वती भुवन सेंटनरी स्कूल,औरंगपुरा, औरंगाबाद.
  ५) श्रीम.शलाका काळकर, सहायक शिक्षिका, श्रीम.एस.एम.पटेल मराठी माध्यमिक विद्यालय, दहिसर (पूर्व) मिस्कविटानगर, विद्यामंदिर मार्ग, दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८
  ६) श्री.जी.एल.शिंदे, सहायक शिक्षक, गुरुवर्य रा.वि.पाटणकर,सर्वोदय विद्या मंदिर माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालय,राजूर,अहमदनगर.

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो,

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. तुमच खूप खूप कौतुक. या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासासाठी आपली पूर्वतयारी व्हावी, ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे, हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे.

एकूण ४५ दिवसाचा हा अभ्यास तुमच्यातील भाषिक कौशल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येक दिवशी दिलेला भागाचा अभ्यास करून त्यामध्ये दिलेल्या कृतींच्या उत्तरांचे लेखन तुमच्या वहीत करावयाचे आहे. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतींचा समावेश आहे. दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात.कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या.

'जाणून घेऊ या', 'सक्षम बनू या', 'सराव करू या' संबोधाने तुमच्याशी प्रत्यक्ष शक्य नाही तरी अप्रत्यक्ष संवाद साधायचा प्रयत्न केला आहे. जाणून घेऊ या मध्ये असलेल्या कृती सहज सोडवता येतील अशा आहेत,तसेच सक्षम बनू या मधील आशय समजून घेताना व कृती सोडवताना तुम्ही आपल्या पालकांची किंवा शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या. सराव करू या मधील कृती मात्र स्वप्रयत्नाने सोडवा.

तुम्ही चौदा दिवस या सेतूचा अभ्यास केल्यानंतर पंधराव्या दिवशी तुम्हाला एक चाचणी दिली आहे. ती सोडवून आपल्या शिक्षकांकडून तपासून घ्या.याप्रमाणे तिसाव्या दिवशी आणि शेवटी पंचेचाळीसाव्या दिवशी अशा तीन चाचण्या सोडवायच्या आहेत. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा व उत्तरांची खात्री आपल्या शिक्षकांकडून करून घ्या.

हा सेतू अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

ज्ञानसेवा ते शाळेत्यम
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे.

शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड 19 च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सेतू अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सेतू अभ्यासात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती/क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे.विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संकल्पनाप्रमाणे जाणून घेऊ या मध्ये संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी **'जाणून घेऊ या'** त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या'** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** मध्येच मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने अधिक चिकित्सक विचार करावा, सर्जनशील व्हावे, अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **'कल्पक होऊ या'** या सदरांचा समावेश केला आहे. .
- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- 'चला सराव करू या' हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.
- वयानुरूप समकक्ष वर्गातील मुलांसाठी SCERT मार्फत तयार केलेल्या विद्यार्थी मित्र व शिक्षक मार्गदर्शिका यांचा संदर्भ म्हणून उपयोग करावा.

ज्ञानसेवा तू साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू अभ्यास कृती आराखडा

इयत्ता – नववी विषय – मराठी (द्वितीय भाषा) कालावधी – ४५ दिवस

➢ उद्दिष्टे:-

1. कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.
2. विद्यार्थ्यांना गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेच्या भाषा अध्ययनातील अंतर भरून काढण्यास मदत करणे.
3. विद्यार्थ्यांना मागील इयत्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे.
4. विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे.
5. विद्यार्थ्यांना अभिव्यक्त (लेखन) होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

➢ अपेक्षित कौशल्य/ संकल्पना(इयत्ता निहाय):-

1. मौखिक भाषा विकास- श्रवण,भाषण संभाषण .....
2. भाषाभ्यास – व्याकरण घटकावर आधारित /भाषिक घटकावर आधारित
3. वाचन- पठित /अपठित उतारे
4. लेखन – उपयोजित लेखन

➢ क्षमता क्षेत्र-

- **श्रवण -** गीते, समूहगीते, कविता, वक्त्यांची भाषणे व विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे.
- **भाषण-संभाषण** – विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमांतून आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे.
- **वाचन** – विविध साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.
- **लेखन -** ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्याच्या आशया वरील काढलेल्या टिपणांच्या मुद्दयांचा विस्तार करता येणे.
- **भाषाभ्यास** – व्याकरण घटकावर आधारित /भाषिक घटकावर आधारित व्याकरण माहिती घेणे. सराव करणे.

अनुक्रमणिका

अ.न.	घटकाचे नाव	दिवस	पान क्रमांक
१	काव्यानंद	१	७
२	गद्य विभाग	२, ३	८, ९
३	पद्य विभाग	४, ५	१०, ११
४	भाषाभ्यास- विरामचिन्हे	६, ७	१२, १३
५	उपयोजित लेखन - कथा	८, ९	१४, १५, १६, १७
६	भाषाभ्यास- वाक्य आणि वाक्याचे प्रकार	१०, ११	१८, १९
७	गद्य विभाग	१२, १३	२०
१४	गद्य विभाग (बातमी लेखन)	१४	२१
८	चाचणी क्रमांक – १ (गुण – १५)	१५	२२
९	गद्य विभाग	१६, १७	२३
१०	पद्य विभाग	१८, १९	२४, २५
११	उपयोजित लेखन -जाहिरात	२०, २१	२६, २७, २८, २९
१२	गद्य विभाग	२२,२३	३०, ३१
१३	उपयोजित लेखन- पत्र	२४, २५, २६	३२, ३३, ३४, ३५
१४	भाषाभ्यास- विरामचिन्हे	२७, २८	३६
१५	भाषाभ्यास- शब्दाची जात	२९	३७
१६	चाचणी क्रमांक – २ (गुण – १५)	३०	३८
१७	गद्य विभाग-शब्दकोश	३१, ३२, ३३	३९, ४०, ४१, ४२
१८	पद्य विभाग	३४, ३५	४३
१९	भाषाभ्यास- विरामचिन्हे	३६, ३७	४४
२०	उपयोजित लेखन -वर्णनात्मक निबंध	३८, ३९, ४०	४५, ४६, ४७, ४८
२१	उपयोजित लेखन – संवाद	४१, ४२	४९, ५०, ५१, ५२
२२	पद्य विभाग	४३, ४४	५३, ५४
२३	चाचणी क्रमांक – ३ (गुण – ३०)	४५	५६, ५६

दिवस : १ ला

कौशल्य :- श्रवण / वाचन

क्षमता : गाणी, कविता, समूह गीते योग्य अभिनयासह व योग्य अरोह-अवरोहासह म्हणता येणे. साहित्य प्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे.

१. आम्ही चालवू हा पुढे वारसा



गुरुने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा!

पिता-बंधु-स्नेही तुम्ही माउली
तुम्ही कल्पवृक्षातळी सावली
तुम्ही सूर्य अम्हां दिला कवडसा!



जिथे काल अंकुर बीजातले
तिथे आज वेलीवरी ही फुले
फलद्रुप हा वृक्ष व्हावा तसा!

शिकू धीरता, शूरता, वीरता
धरू थोर विद्येसवे नम्रता
मनी ध्यास हा एक लागो असा!



जरी दुष्ट कोणी करू शासन
गुणी सज्जनांचे करू पालन
मनी मानसी हाच आहे ठसा!

तुझी त्याग-सेवा फळा ये अशी
तुझी कीर्ति राहील दाही दिशी
अगा पुण्यवंता भल्या माणसा!

P5BDE7

शिक्षकांनी प्रस्तुत गीत विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणवून घ्यावे. तसेच समूहगीताच्या ध्वनिफिती ऐकावाव्यात.

दिवस २ / ३

- **क्षेत्र / कौशल्य** - श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - वाचलेल्या साहित्यावर विचार करतात आणि अधिक समजून घेण्यासाठी प्रश्न विचारतात, चर्चा करतात.
- **संकल्पना** – **आत्मचरित्र**

जाणून घेऊ या

- विद्यार्थ्यानी पुढील उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करावे व पुढील कृतींची उत्तरे आपल्या शिक्षक किंवा पालकांच्या मदतीने सोडवावीत.

आता तुम्हाला माझीच गोष्ट सांगतो. माझं प्राथमिक शिक्षण एका लहानशा खेडयात झाल. माझं खेडं अतिशय निसर्गरम्य आणि सुसंस्कृत होतं. घनदाट जंगलं, दुथडी भरून वाहणारी नदी, निळे डोंगर, हिरवी राने अवघा आनंदीआनंद. अशा वातावरणात माणसातली सर्जनशीलता उफाळून आली नाही तर नवलच! माझा एक मित्र होता आम्हाला खूप वाटायचं की आपण चित्र काढावीत पण काय करणार आमच्याकडे कसलीच साधनं नव्हती. पेन्सिल, रंग, ब्रश ते तर सोडाच. साधा कागदही नव्हता. अभ्यासाची एकच वही, पाटीवर लिहिण्याची एक पेन्सिल तिचे तुकडे झाले तरी सांभाळून वापरावे लागायचे. दुसरी मिळण्याची शक्यता नव्हती. शिवाय सगळ्यात मोठी अडचण किंवा धाक असा होता, की चित्रंबित्रं काढलेली ना मास्तरांना आवडायची ना (आणि) घरातल्यांना. वात्रटपणा वाटायचं.

१)योग्य पर्याय निवडा –

वरील उताऱ्यातील लेखन करणारे –

१) लेखकाचे मित्र २) लेखक स्वत: ३) लेखकाची

२)उताऱ्यात आलेले वर्णनाचा कालखंड –

१) प्रौढाअवस्थेतील २) वृध्दास्थेतील ३)बालपणातील

३) वैशिष्ट्ये सांगा .

उताऱ्यात आलेल्या खेड्याचे विशेष .

१).....२).....३).....४).....

४) काय ते लिहा.

लेखकाला बालपणात भासलेली उणीव .....

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

सक्षम बनू या

- विद्यार्थ्यांनी वरील कृतींच्या मदतीने आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आत्मचरित्र या साहित्यकृतीची वैशिष्ट्ये समजून घ्यावीत . इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकातील 'मी चित्रकार कसा झालो' या आत्मचरित्रात्मक पाठाचे समजपूर्वक वाचन करावे.

सराव करू या

कोल्हापूर मधील कळंबा मध्यवर्ती कारागृहाजवळ रस्त्याला लागुनच एका सरळ रेषेत पंधरा वीस झोपड्या होत्या. त्यातल्याच एका झोपडीत आम्ही राहत होतो. मातीच्या कच्च्या विटांनी बांधलेल्या भिंती, त्यापण पावसाचं पाणी मुरून पडण्याच्या बेतात होत्या. फुटकीतुटकी कौल वरती टाकली होती. आतली जमीन तर सतत ओलसरच असायची त्यामुळे त्या झोपडीत नेहमी कुबट वास यायचा.उठून उभ राहिलं तर वरची कौल डोक्याला धाडकन लागायची मोठ्या माणसांना उभ राहून कसलच काम करता येत नव्हतं. झोपडीत एका बाजूला चारपाच फाटक्या वाकळा पडलेल्या त्याच वाकळा आम्ही अंथरायला पांघरायला वापरत असू.

कृती

१) वर्णन करा.

लेखिकेच्या घराचे वर्णन करा.

२) कारण सांगा.

लेखिकेच्या घरात नेहमी कुबट वास यायचा.

३) तुमच्या घराचे पुढील मुद्द्यांना अनुसरून वर्णन करा.

ठिकाण, वैशिष्ट्ये, आजूबाजूची ओळखीची खूण.

४) तुमच्या बालपणीच्या कोणत्याही एका प्रसंगाचे वर्णन करा.

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस ४ व ५

- **क्षेत्र / कौशल्य** - श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - गाणी, कविता तालासुरात म्हणता येणे. समजपूर्वक वाचन करता येणे.
- **संकल्पना** - पद्य.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी खालील प्रमाणे उदाहरणे देऊन त्यातील फरक काय आहे या बाबत विद्यार्थ्यांशी चर्चा करावी

उदाहरण १ -

सृष्टीच्या मंजुळ गाण्याकडून मी जगायला शिकलो
तसेच झिलमिलणाऱ्या चंद्र चांदण्यांनीही मला जगायला शिकवले.

सृष्टीचे मंजुळ गाणे
जगणे मजला शिकवून गेले
झिलमिलणारे चंद्र चांदणे
जगणे मजला शिकवून गेले

उदाहरण २ -

टपटप टपटप पडती गारा,
पटपट पटपट वेचू साऱ्या.
पकडुनि धरता वितळुनि गेल्या,
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या.

गडगड गडगड मेघ गरजती,
चमचम चमचम विजा चमकती.
थुईथुई थुईथुई मोर नाचती,
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या.


थडथड थडथड थंडी वाजते,
हाक आईची ऐकू येते.
घरात जाउनि स्वच्छ होऊया,
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या.

उत्तरे द्या / लिहा -

१. गारा केव्हा वितळतात ?
२. मोर आनंद कसा व्यक्त करतो?

सक्षम बनू या -

विद्यार्थ्यांनी वरील बालगीतांप्रमाणे इतर बालगीते ऐकावीत. बालगीतांमध्ये आलेले घटक शिक्षकांच्या मदतीने समजून घ्यावेत. काव्यावर आधारित विविध कृती सोडवाव्यात. शिक्षकांनी विविध कृती देऊन मुलांना काव्य ही संकल्पना समजून द्यावी.गद्य व पद्य यातील भेद समजून सांगावा.



विद्यार्थ्यांनी कविता तालासुरात म्हणण्याचा प्रयत्न करावा व कृती सोडवून कविता समजून घ्यावी.

- **कृती -**

१) कवितेत कशाचे वर्णन केले आहे?

२) कवितेत आलेले नादमय शब्द लिहा.

सराव करू या

विद्यार्थ्यांनी कवितेच्या आधारे कृती सोडवाव्यात.

- **कृती**

१) कोठे ते लिहा -

१) पाखरांची किलबिल - _____

२) सान ससूलं लोळतं - _____

३) दव बिंदूंचे डूल झुलतात - _____

२) दिलेल्या ओळींचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा -

दूर पूर्वेस लालबुंद
कुंकू क्षितिजाच्या भाळी

****

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस ६ व ७

- **क्षेत्र / कौशल्य** - **भाषाभ्यास**
- **क्षमता-** व्याकरण घटकांची माहिती घेतात. त्यांच्या लेखनात उपयोग करतात. उदा. विरामचिन्हे
- **संकल्पना** – **विरामचिन्हे** (पूर्णविराम,अर्धविराम, स्वल्पविराम,अपूर्णविराम)

जाणून घेऊ या

विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची विरामचिन्हे उपयोगात आणून वाक्ये तयार करावीत आणि त्यांचे दृढीकरण करावे.

१) गणेश घरी गेला.
२) राकेश आला; पण गाव कायमचे दूर झाले.
३) शिखर, रोहित, हार्दिक, शुभमन हे क्रिकेट खेळाडू आहेत.
४) सृष्टी, इकडे ये.

आपल्या ग्रंथालयात असलेली पुस्तके खालीलप्रमाणे :

१) श्यामची आई
२) पालापाचोळा
३) उचल्या

विद्यार्थ्यांनी पुढील वाक्यांचे समजपूर्वक अरोह अवरोहसह वाचावे व निरीक्षण करावे.

१) वाक्य पूर्ण झाले आहे हे दाखवण्यासाठी कोणते चिन्ह उपयोगात आणले आहे ?
२) दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययानी जोडताना वापरलेले चिन्ह -------
३) एकाच जातीचे शब्द लागोपाठ आले असताना आलेले चिन्ह ----------
४) हाक मारताना संबोधनापुढे उपयोगात आणलेले चिन्ह ----------
५) पुस्तकांचा तपशील देताना त्यापूर्वी कोणते चिन्ह उपयोगात आणले आहे ?

वरील प्रश्नांच्या आधारे विद्यार्थ्यांनी पूर्णविराम अर्धविराम स्वल्पविराम आणि अपूर्णविराम यांची वैशिष्ट्ये समजून घ्यावीत.

सक्षम बनू या

१) पद्मा अभ्यास करते.
२) सृष्टी आली; पण तिने नेहमीचे फुले आणली नाहीत.
३) अथर्व, अक्षरा, मृणाल, सोनल, अनिरुद्ध व राघव हे सगळेजण आज जेवायला येणार आहेत.
४) काही सुगंधी फुलांची नावे खालीलप्रमाणे :
    १) जाई
    २) जास्वंद
    ३) प्राजक्त
    ४) चाफा

वरील वाक्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी वाक्य पूर्ण होण्यासाठी, दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्यये जोडताना, एका जातीचे शब्द व संबोधन यापुढे किंवा वाक्याच्या शेवटी तपशील देताना कोणत्या प्रकारची चिन्हे उपयोगात आणली जातात हे समजून घ्यावे.

शिक्षकांनी वरील उदाहरणांच्या मदतीने तसेच अधिक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम, अपूर्णविराम या विरामचिन्हांच्या व्याख्या तयार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. विरामचिन्हे ज्या खुणांनी दाखविली जातात त्या खुणा अधिक स्पष्ट कराव्यात.

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम, पूर्णविराम याचे क्रमवार मार्गदर्शन करावे.

प्रश्न :- पुढे ठळक अक्षरात दिलेल्या विरामचिन्हांचा नावांसाठी योग्य असणाऱ्या चिन्हांच्या पर्याय क्रमांक गोल करा.

१) पूर्णविराम :- (1) , (2) ! (3) . (4) ?
२) अर्धविराम :- (1) ? (2) ! (3) ? (4) ;
३) स्वल्पविराम :-(1) ? (2) ; (3) , (4) !
४) अपूर्णविराम :- (1) ? (2) : (3) ? (4) .

प्रश्न विद्यार्थ्यांनी पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम आणि अपूर्णविराम यांची उदाहरणे स्वतः तयार करावीत.

शिक्षकांनी वरील कृतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विरामचिन्हांचा नाट्य उताऱ्यात उपयोग अथवा समूह चर्चा करण्यास प्रोत्साहन द्यावे.

****


ज्ञानसेवा तू साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस ८ वा.

- **क्षेत्र / कौशल्य :** **लेखन**
- **क्षमता :-** स्वत:चे अनुभव स्वत:च्या भाषाशैलीत लिहितात. लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून अनुभव लेखन करतात. (उदा. कथा, कविता, निबंध अशा वेगवेगळ्या पद्धतीने अनुभव लेखन करणे.) दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.
- **संबोध :-** **कथा**

जाणून घेऊ

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बाजूच्या चित्रकथेचे निरीक्षण करण्यास सांगून विद्यार्थ्यांसोबत कथेतील पात्रे चर्चा करावी तसेच गटात चर्चा करण्यास सांगावी.



सोबतच्या चित्रकथेमध्ये कावळा काय विचार करत असेल ?

सोबतच्या चित्रकथेला काय नाव द्याल ?

सोबतच्या चित्रकथेचे निरीक्षण करून कथा लिहा ?

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रकथेचे निरीक्षण करण्यास सांगून विद्यार्थ्यांचे गट तयार करून वरील कथेतील पात्रे, घटना, स्थळ, सुसंगतता या विषयी गटात चर्चा करण्यास सांगावी. शिक्षकांनी वरील प्रकारे सोप्या प्रश्नातून विद्यार्थ्यांची कथेविषयी जाण लक्षात घ्यावी. तसेच कावळ्याच्या जागी तुम्ही असता तर काय केले असते?या प्रश्नावर सुद्धा चर्चा घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी कथा लेखनाची संकल्पना अधिक दृढ करण्यासाठी पुढील गोष्टी कराव्यात.

- मुलांनी लिहिलेल्या वरील कथेचे प्रकट वाचन करण्यास सांगावे.
- कथा या साहित्य प्रकाराबद्दल चर्चा करावी.
- कथेचे विविध प्रकाराची वैशिष्ट्ये सांगावीत

- गटात कथा लेखनाची चर्चा करावी.
- विद्यार्थ्यांच्याकडून खालील कृती सोडवून घ्या.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील मुद्द्यांवरून कथा लिहायला सांगावी.

१) कथेचा काळ.....
२)कथेतील पात्र .....
३)कथेचे तात्पर्य .....
४) कथेतील घटना.....
५) कथेचे शीर्षक.....

कथाबीज, कथेची सुरुवात, कथेतील घटना, स्थळ, कथेतील पात्रे व त्यांचे स्वभाव, कथेची भाषा, काळ, कथेचा शेवट, शिकवण इ. बाबत चर्चा करून कथालेखन ही संकल्पना अधिक स्पष्ट करावी.

चला सराव करु या

वरील चित्र कथेचा कथेच्या निकषानुसार इतर चित्र कथेचा सराव करून घ्यावा व गटा-गटात त्याचे वाचन करून घ्यावे.

****

ज्ञानसेवा सुसंफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस ९ वा.

- **क्षेत्र / कौशल्य :** **लेखन**
- **क्षमता :-** स्वत:चे अनुभव स्वत:च्या भाषाशैलीत लिहितात. लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून अनुभव लेखन करतात. (उदा. कथा, कविता, निबंध अशा वेगवेगळ्या पद्धतीने अनुभव लेखन करणे.) दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.
- **संकल्पना/संबोध :-** **कथा**

जाणून घेऊ या

आधीच्या तासिकेमध्ये चित्रकथेचे निरीक्षण करून लेखन केले. आता काठिण्य पातळी वाढवून दुसऱ्या दिवशी अपूर्ण कथा पूर्ण करा. या प्रकाराबद्दल विद्यार्थ्यांना काय माहीत आहे किवा ते कसे लिहितात हे जाणून घेऊया .

दिलेली अपूर्ण कथा विद्यार्थ्याकडून पूर्ण करून घ्यावी. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे मुलांनी कथा कशी पूर्ण केली का पहावे.

उन्हाळ्यात सुट्टीत इ. 8 वी मध्ये शिकत असलेला एक मुलगा खेडेगावात राहणाऱ्या त्याच्या मामाच्या गावी गेला. दोन दिवस अगदी मजेत राहिला. मामाच्या गावी मोठी नदी होती. या मुलाला नदीत पोहायची इच्छा निर्माण झाली. त्याला थोडेफार पोहता येत होते. मामाला न विचारता तो एके दिवशी एकटाच नदीवर पोहायला गेला, मामाने सांगूनही त्याचे त्याने ऐकले नाही.

त्याने कपडे काढले पाण्यात उडी घेतली. पोहता पोहता त्याच्या लक्षात आले, की आपण खूप खोल पाण्यात गेलो आहोत, तो आता खूप दमला होता. त्याना पाण्याचा अंदाज लागेना. तो खूप घाबराला होता. इकडे तिकडे पाहून आता जोर जोराने हाका मारु लागला - 'अहो मला मदत करा! कुणीतरी मला मदत करा ऽऽऽ.....!'

शेजारच्या शेतालील एका गुराख्याने तो आवाज ऐकला..

अन्.....

वरीलप्रमाणे विविध अपूर्ण कथा देऊन त्यांचे लेखन करून घ्यावे व कथेच्या निकषाचा विचार करून आपल्या वर्गातील मुले कथा लेखनाच्या कोणत्या टप्प्यावर आहे हे पाहावे व त्यानुसार पुढील नियोजन करावे.

सक्षम बनू या

प्रशिक्षण परिषद, पुणे.

वरील प्रमाणे कथेचे मुलांनी लेखन केल्यानंतर या ठिकाणी एखाद्या चित्रपटाचे कथानक समोर घेऊन त्याविषयी पुढील गोष्टीवर चर्चा करून विद्यार्थ्याकडून कथा लिहून घ्यावी .

- चित्रपट आवडीची कारणे
- चित्रपटाची मांडणी
- चित्रपटाची कथा व आपण लिहिलेली कथा यांची तुलना
- कथा लिहिताना आवश्यक असणाऱ्या बाबी .

या सर्व बाबीवर चर्चा झाल्यानंतर विविध प्रकार देऊन कथा लेखनाचा सराव करून घ्यावा.

सराव करू या

सरावासाठी विद्यार्थ्यांना मुद्दे देऊन, शब्द देऊन, शीर्षक देऊन, कथाबीज देऊन, कथेची सुरवात, मध्य, शेवट देऊन कथा पूर्ण करण्यासाठी सराव देणे. उदा.

२६ जानेवारी, भारताचा गणतंत्र दिन. अर्णव स्वच्छ शालेय गणवेशात तयार होऊन शाळेत गेला. माननीय प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम सुरू झाला. विद्यार्थ्यांनी ध्वजवंदन केले. राष्ट्रगीत, ध्वजगीत, देशभक्तीपर गीत सादर केले. अध्यक्षांच्या प्रेरणादायी भाषणानंतर अर्णवचे देशभक्तीचा संदेश देणारे व देशभक्ताबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे भाषण झाले. वृक्षारोपण, खाऊवाटप झाल्यानंतर मुले घरी जायला निघाली.

अर्णवदेखील आपली तीनचाकी सायकल घेऊन निघाला. सावकाशपणे हुतात्मा चौकापर्यंत पोहोचला. लाल दिव्याचा संकेत मिळताच जागेवरच थांबला. चौकात खूप गर्दी होती. अनेक छोटी मुलं हातात छोटे तिरंगी झेंडे घेऊन पालकांच्या वाहनांवर बसली होती. हिरवा दिवा दिसताच थांबलेली गर्दी पुढे सरकली. अर्णवनेही हाताने चाकाला वेग दिला. एवढ्यात सर्वांचं लक्ष वेधून घेणारं असं.....

खालील प्रमाणे कथालेखनाच्या विविध कृती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्याव्या व पाठयपुस्तकातील या संदर्भाच्या कृती सोडवून घ्याव्यात.

- शीर्षकावरून कथा लिहा. उदा . चातुर्य
- शब्दावरून कथा लिहा- जंगल
- कथा बीजावरून कथा लिहा - एकीचे बळ
- दिलेल्या शब्दांवरून कथालेखन
- अपूर्ण कथा पूर्ण करणे. अ) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे. ब) उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.
- मुद्द्यांवरून कथालेखन.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

******

दिवस १०/११ वा.

- **क्षेत्र / कौशल्य** - भाषाभ्यास .
- **क्षमता** – विद्यार्थी वाक्य आणि वाक्याचे प्रकार हे घटक जाणून घेतात. वाक्य लेखनात त्याचा योग्य उपयोग करतात. व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात.
- **संकल्पना** – वाक्य आणि वाक्याचे प्रकार - केवलवाक्य, संयुक्तवाक्य, मिश्रवाक्य

जाणून घेऊ या

शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी वाक्य व वाक्याचे अर्थावरून पडणाऱ्या प्रकारची विविध उदा.तयार करावीत आणि त्याचे दृढीकरण करावे.

स्वरूपावरून पडणारे प्रकार

- **केवलवाक्य –**
  - **१) शाम पेरू खातो.**
  - **२) यश खो-खो खेळतो.**

विद्यार्थ्यांनी वरील वाक्यांचे समजपूर्वक वाचन करावे व पुढील कृतींची उत्तरे लिहावीत.

१)वाक्यातील कर्ता-..... २) वाक्यातील कर्म - .....३) वाक्यातील क्रियापद .....

४) वाक्यात किती कर्ता, किती कर्म, व किती क्रियापद आहेत.

वरील कृतींच्या आधारे विद्यार्थ्यांनी केवल वाक्याची वैशिष्ट्ये समजून घ्यावीत.

- **संयुक्त वाक्य –**
  - १) संध्या घरा बाहेर गेली आणि विजांचा कडकडाट सुरू झाला.
  - २) सुरेशने दादास बघितले अथवा तात्यास हे त्याला आठवत नव्हते.

विद्यार्थ्यांनी वरील विधानाचे समजपूर्वक वाचन करावे व पुढील कृतींची उत्तरे द्यावीत

१) वरील विधानातील कर्ता.....२) वरील विधानातील कर्म .....

३) वरील विधानातील क्रियापदे..... ४) वरील विधानातील कर्ता, कर्म, क्रियापद यांची संख्या .....

५)वरील विधात आलेली वाक्यांची संख्या .....

६) वरील विधानातील वाक्य कोणत्या उभयान्वयी अव्ययाने जोडले आहे . १).....२).....

विद्यार्थ्यांनी वरील कृतींच्या मदतीने संयुक्तवाक्य या वाक्य प्रकारची वैशिष्ट्ये तयार करावीत.

- **मिश्र वाक्य**
  - १) चित्रपटात संधी मिळावी म्हणून तो मुंबईला गेला.
  - २) जो अभ्यास करेल तो पास होईल.
  - ३) आभाळ गरजत होते म्हणून पाऊस आला.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील विधाने समजपूर्वक वाचायला लावावीत व खालील प्रश्न विचारावेत.

१) वरील विधानात किती वाक्ये आहेत ?

२) वरील वाक्ये कशाने जोडलेली आहेत ?

३) वरील वाक्ये एकमेकांवर अर्थाच्या दृष्टीने अवलंबून आहेत का ?

विद्यार्थ्यांनी वरील कृतींच्या मदतीने मिश्रवाक्य या वाक्यप्रकारची वैशिष्ट्ये तयार करावीत.

ज्ञानसेवा तू साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

१) तू कोणते पुस्तक वाचतोस? (प्रश्नार्थी)

२) मला अभ्यास करायला आवडते(होकारार्थी) .

३) मी क्रिकेट खेळत नाही(नकारार्थी) .

वरील वाक्यांच्या मदतीने केवल वाक्य हे वाक्याच्या अर्थावरून पडणाऱ्या आज्ञार्थी, होकारार्थी, नकारार्थी, अशा कोणत्याही प्रकारचे असू शकते.हे विद्यार्थ्यांनी समजून घ्यावे.

शिक्षकांनी वरील प्रमाणे व्याख्या आणि काही उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवल वाक्य ,संयुक्त वाक्य आणि मिश्र वाक्य या संदर्भात मार्गदर्शन करावे. दिलेल्या उदाहरणांमध्ये येणाऱ्या उभयान्वयी अव्ययांच्या संदर्भाने उभयान्वयी अव्ययातील प्रधानत्व आणि गौणत्व या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील वाक्य,वाक्याचे भाग आणि वाक्याचे प्रकार यांचे क्रमवार मार्गदर्शन करावे.

१) तो शहरात गेल्याने खूप नुकसान झाले.

२) जेव्हा मी बैलगाडीने गेलो तेव्हा शेतात नांगरणे सुरू होते.

३) श्रीदेवी भाजी किंवा भाकरी खाते.

४) तो घरात आला तर सर्वांना आनंद होईल.

५) वीज चमकली आणि पावसाला सुरुवात झाली

६) सृष्टी गाणी गाते.

वरील उदाहरणांच्या माध्यमातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवल वाक्य, संयुक्त वाक्य आणि मिश्र वाक्य यांवर चर्चा घडवून आणावी.

पुढील वाक्याचे प्रकार ओळखा.

१) शरद जात होता.

२) तो घरी आला की आपण सण साजरा करूयात.

३) लोक आपल्याला चांगले म्हणतील किंवा वाईट याचा मी विचार करत नाही.

शिक्षकांनी वरील उदाहरणे विद्यार्थ्यांना देऊन केवल वाक्य मिश्र वाक्य आणि संयुक्त वाक्य ही संकल्पना स्पष्ट होण्यास हातभार लावावा.

सराव करू या

खालील वाक्य प्रकारांची उदाहरणे तुम्ही स्वत: तयार करून लिहा.

१) केवल वाक्य

२) संयुक्त वाक्य

३) मिश्र वाक्य

शिक्षकांनी वरील प्रमाणे विद्यार्थ्यांकडून स्वत: उदाहरणे तयार करून घ्यावीत. आवश्यक तेथे गटचर्चा वा वैयक्तिक स्वरूपात संवाद साधावा.

****

ज्ञानसेवा तु सफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस १२/१३

- **क्षेत्र / कौशल्य - श्रवण /वाचन /लेखन**
- **क्षमता** – वाचलेल्या साहित्यावर विचार करतात आणि अधिक समजून घेण्यासाठी प्रश्न विचारतात, चर्चा करतात
- **संकल्पना – अनुभव कथन**

जाणून घेऊ या

आपल्याला आलेले अनुभव आपण अनेक माध्यमांद्वारे इतरांना सांगू शकतो त्यातील एक प्रकार म्हणजे पत्रलेखन. अशी सुंदर पत्रलेखनही साहित्यात नोंदली गेली आहे. विद्यार्थ्यांनी खालील उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करावे आणि आपल्या अनुभवाची तुलना प्रस्तुत वर्णनाशी करावी.

दादा, कालच मी सहलीला जाऊन आले. अरे, इतकी मजा आली, काय सांगू! या महिन्यात विज्ञान केंद्रातर्फे आमच्या शाळेत पक्ष्यांसंबंधीची चित्रफीत दाखवली. ती पाहून आणि तेव्हा ताई-दादांनी सांगितलेली माहिती ऐकून या वर्षी शाळेची सहल एखाद्या अभयारण्यातच न्यायची, असा हट्ट आम्ही शिक्षकांजवळ धरला. सहलीच्या दिवशी आम्ही पहाटेच निघालो. सोलापूर-बार्शी मार्गावर बावीस किलोमीटर अंतरावर असलेल्या नान्नज गावाजवळ 'माळढोक अभयारण्य' आहे. ठरलेल्या वेळी आम्ही तिथे पोहोचलो. अभयारण्यातून फिरत असताना सर सांगत होते, की 'भारतातून नष्ट होण्याच्या मार्गा वर असलेल्या माळढोक या अत्यंत देखण्या पक्ष्याला वाचवण्यासाठी वनविभागानं हे अभयारण्य घोषित केलेलं आहे. माळढोक पक्षी शेतकऱ्याचा मित्र आहे, कारण शेतातील किड्यांवर तो गुजराण करतो. हा पक्षी वर्षातून एकदाच अंडी घालत असल्याने त्यांची संख्या कमी आहे. शिवाय इतर प्राण्यांनी माळढोक पक्ष्यांची अंडी तुडवली, तर संख्या आणखीनच कमी होते.

१) उताऱ्यातील वर्णन कोणी केले आहे.
२) उताऱ्यातील वर्णनाचा विषय-
३) उताऱ्यात वर्णन केलेल्या घटकाच्या विशेष बाबी.
४) तुम्हाला माहित असलेल्या अभयारण्या विषयी माहिती लिहा .

सक्षम बनू या

- विद्यार्थ्यांनी अनुभव कथन या साहित्यप्रकाराविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आपल्या शिक्षकांशी किंवा पालकांशी चर्चा करावी. तसेच अशा विविध अनुभव कथनाचे वाचन करावे.

सराव करू या

बरं का बाबा, रायगडाप्रमाणेच राजगडसुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचे ठिकाण. किती प्रचंड आणि भव्य किल्ला हा! या राजगडाचे भौगोलिक स्थान आणखीनच आगळेवेगळे. उत्तरेला गुंजवणी नदी, दक्षिणेला वेळखंड नदीवर भाटघर धरण, पूर्वेला पुणे-सातारा रस्ता तर पश्चिमेला सह्याद्रीचा घाटमाथा. भाटघर धरणाचे अथांग जलाशय आणि सृष्टि सौंदर्य बघून मला तिथून परतावंसंच वाटतं नव्हतं. बाबा, आमच्या सोबत अत्यंत बोलका आणि तज्ज्ञ मार्गदर्शक होता. तुम्ही मला नेहमीच किल्ल्यां बाबत सांगता तशी त्या मार्गदर्शकाने आम्हांला किल्ल्याबाबत खूप छान माहिती पुरवली. त्याने सांगितले, 'या किल्ल्याची उंची जास्त आहे. याचा घेर बारा कोसांचा आहे. शिवाजी महाराजांनी त्याचा विस्तार केला. त्याला राजधानीचे ठिकाण बनवले. राजधानीला आवश्यक असलेले सर्व बांधकाम इथे करून घेतले.' बाबा, मी त्या किल्ल्याचे दुरून निरीक्षण केले.मला या किल्ल्याचा आकार उपड्या ठेवलेल्या सिलिंग फॅनसारखा जाणवला. मध्यभागी पंख्याचा उंचवटा म्हणजे बालेकिल्ला. पंख्याची तीन पाती म्हणजे पद्मावती, सुवेळा आणि संजीवनी या तीन माच्या.

१) लेखकाने वर्णन केलेल्या ठिकाणाचे नाव-
२) कारण सांगा.लेखकाला रायगडाचे स्थान आगळेवेगळे वाटते -
३) फक्त शब्दात उत्तर लिहा..... लेखकाला गुंतून ठेवणारा परिसर.
४) तुम्ही सहलीमध्ये पाहिलेल्या ठिकाणचे वर्णन वडिलांना पत्राने कळवा.

दिवस १४ वा.

- **क्षेत्र / कौशल्य - श्रवण /वाचन /लेखन**
- **क्षमता** – दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्ट्यपूर्ण घटना, सद्यस्थिती, अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात.
- **संकल्पना – बातमी**

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील बातमी समजपूर्वक वाचण्यास सांगावे व बातमीविषयी गटात चर्चा करण्यास सांगावे तसेच पुढील कृतींच्या आधारे बातमीतील महत्त्वाचे घटक समजून द्यावे.

२० डिसेंबर लोकप्रतिभा

चित्रकला शिबिराचा समारोप

उन्नौली (ता. भोर) :उन्नौली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दहा दिवसांचे चित्रकला शिबिर नुकतेच संपन्न झाले. १९डिसेंबर रोजी दुपारी ४.००ते ६.००यावेळात शिबिराचा समारोप समारंभ साजरा झाला. याशिबिराची सांगता प्रसिद्ध चित्रकार श्री. अविनाश शिवतरे यांच्या मनोगताने करण्यात आली.आपल्या जीवनातील कलेचे महत्त्व सांगताना प्रत्येकाने कोणती-ना-कोणती कला शिकणे आवश्यक आहे, हा विचार त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. समारंभाचे अध्यक्षस्थान प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. सदाशिव शिंदे यांनीभूषवले. कलाशिक्षिका श्रीम. सुनीता सोमण यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले.यानिमित्ताने सर्व पंचवीस शिबिरार्थींच्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

१) बातमीचा विषय काय आहे .
२) बातमी किती तारखेला दिली आहे.
३) तुम्हाला बातमीतील कोणती घटना महत्त्वाची वाटते.
४) बातमीतील कार्यक्रम कोणत्या तारखेला झाला आहे.
५) कार्यक्रम झाला ते ठिकाण तालुका .....

सक्षम बनू या

विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातील विविध बातम्यांची कात्रणे काढून वरील कृतीप्रमाणे संबंधित बातम्यांची उत्तरे लिहावीत.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावविश्वाशी संबंधित बातम्या निवडण्यासाठी मार्गदर्शन करावे.

सराव करू या

मध्य रेल्वे: मुसळधार पावसामुळे 30 गाड्या रद्द; 12 गाड्यांचा बदलला मार्ग

मुंबई: ता. २१: मुंबई आणि कोकण परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे रेल्वेची वाहतुक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. रत्नागिरी, चिपळूण, महाड, सांगली, कोल्हापूर या परिसरात सध्या पूरपरिस्थिती उद्भवली आहे. सध्या या ठिकाणी रेस्क्यू ऑपरेशन युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, या साऱ्या परिस्थितीचा कोकण रेल्वेसह मध्य रेल्वेला जबरदस्त फटका बसला आहे. सध्या मुसळधार पावसामुळे प्राप्त परिस्थितीचा आढावा घेता 30 रेल्वे रद्द करण्यात आल्या आहेत. 12 रेल्वेगाड्यांचा मार्ग बदलण्यात आला आहे. तर 8 रेल्वेगाड्यांची वाहतुक काही काळांसाठी स्थगित करण्यात आली आहे. याबाबतची माहिती मध्य रेल्वेने ट्विट करून दिली आहे.

१) बातमीला दिलेले शीर्षक ----------
२) बातमीतील मुख्य भाग-.....
३) बातमीत समाविष्ट परिसर -.....
४) बातमी देणारी संस्था-.....

दिवस १५ वा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे ब्रिज कोर्स चाचणी क्र. १

विषय: मराठी (द्वितीय भाषा)

इयत्ता ९ वी गुण १५

विद्यार्थ्याचे नाव : .....

१. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :.

आता तुम्हाला माझीच गोष्ट सांगतो. माझं प्राथमिक शिक्षण एका लहानशा खेड्यात झाले माझं खेड अतिशय निसर्गरम्य आणि सुसंस्कृत होतं. घनदाटजंगलं, दुथडी भरून वाहणारी नदी, निळे डोंगर, हिरवी राने अवघा आनंदीआनंद. अशा वातावरणात माणसातली सर्जनशीलता उफाळून आली नाहीतर नवलच! माझा एक मित्र होता आम्हाला खूप वाटायचं की आपण चित्र काढावीत पण काय करणार आमच्याकडे कसलीच साधनं नव्हती. पेन्सिल रंग ब्रश ते तर सोडाच. साधा कागदही नव्हता. अभ्यासाची एकच वही पाटीवर लिहिण्याची एक पेन्सिल तिचे तुकडे झाले तरी सांभाळून वापरावे लागायचे. दुसरी मिळण्याची शक्यता नव्हती. शिवाय सगळ्यात मोठी अडचण किंवा धाक असा होता, की चित्रबित्र काढलेली ना मास्तरांना आवडायची ना घरातल्यांना वात्रटपणा वाटायचं.

कृती १ : आकलन कृती: २

सूचनेनुसार कृती करा.

१) वरील उताऱ्यातील साहित्य प्रकार – ☐

२) उताऱ्यात वर्णन केलेला परिसर – ☐

३) वैशिष्ट्ये सांगा. २

उताऱ्यात आलेल्या खेड्याचे विशेष .

↓

↓ ↓ ↓ ↓

☐ ☐ ☐ ☐

४) तुम्हाला आवडलेले एखादे निसर्गरम्य ठिकाण एखादे खेडे गाव व ते का आवडले स्वतःचे मत लिहा. ३

२. पुढील वाक्याचे प्रकार ओळखा. ३

१) शरद जात होता. - ☐

२) तो घरी आला की आपण सण साजरा करूयात. - ☐

३) लोक आपल्याला चांगले म्हणतील किंवा वाईट याचा मी विचार करत नाही. - ☐

३. खालील अपूर्ण कथा पूर्ण करा : ५

उन्हाळ्यात सुट्टीत इ. 8 वी मध्ये शिकत असलेला एक मुलगा खेडेगावात राहणाऱ्या त्याच्या मामाच्या गावी गेला. दोन दिवस अगदी मजेत राहिला. मामाच्या गावी मोठी नदी होती. या मुलाला नदीत पोहायची इच्छा निर्माण झाली. त्याला थोडेफार पोहता येत होते. मामाला न विचारता तो एके दिवशी एकटाच नदीवर पोहायला गेला, मामाने सांगूनही त्याचे त्याने ऐकले नाही. त्याने कपडे काढले पाण्यात उडी घेतली. पोहता पोहता त्याच्या लक्षात आले, की आपण खूप खोल पाण्यात गेलो आहोत, तो आता खूप दमला होता. त्याना पाण्याचा अंदाज लागेना. तो खूप घाबराला होता. इकडे तिकडे पाहून आता जोर जोराने हाका मारु लागला - 'अहो मला मदत करा! कुणीतरी मला मदत करा ऽऽऽ.....!'

शेजारच्या शेतालील एका गुराख्याने तो आवाज ऐकला..... अन्.....

दिवस १६ / १७ वा.

- **क्षेत्र / कौशल्य**- श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - विविध प्रकारचे साहित्य जसे कथा , कविता,....इ.बारकाईने वाचन करून त्यांविषयी अनुमान काढतात, त्याचे विश्लेषण करतात, त्यातील प्रमुख मुद्दे शोधतात.
- **संकल्पना** - **कथा**

जाणन घेऊ या

'मुलांनो, सूर्यास्ता आधी घरी पोहचलेलं बरं!' असे शिक्षकांनी म्हणताच सर्व जण गाडीत जाऊन बसले. घाटातून गाडी जात असताना, मुलांना घाटाच्या खालच्या बाजूने आग लागलेली दिसली. ''अरे, तो बघा वणवा! वणवा लागलाय, वणवा!'' गाडीतील एकजण ओरडला.ड्रायव्हरने लगेच गाडीचा वेग वाढवला. नाहक आपण आगीत सापडू नये, हा त्याचा उद्देश होता.गाडी पायथ्याशी येत असताना उतारामुळे गाडीचा वेग मंदावला. 'गाडी थांबवा! ही आग विझवलीच पाहिजे.'' चौदा वर्षांचा गोपाळ ओरडला. गोपाळच्या या वक्तव्यावर गाडीतील सारेजण हसले. ''अरे वेड्या , ही जंगलाची आग आपण कशी काय विझवू शकू?'' शिक्षक दरडावून म्हणाले; पण ते ऐकायला गोपाळ गाडीत होताच कुठे? त्याने तर लगेच गाडीतून उडीही मारली होती. त्याला परत गाडीत घेण्यासाठी ड्रायव्हरलाही नाइलाजाने गाडी थांबवावी लागली.(इयत्ता सातवी – गोपाळची शौर्यकथा)

१) एका शब्दात उत्तर द्या. कथेचा नायक - .....

२) कोण ते सांगा - कथेत आलेली इतर पात्र -.....

३) काय ते सांगा – कथेतील प्रसंग .....

४) वरील उताऱ्यातील प्रसंगाचा ओघतक्ता तयार करा.

५) कथेच्या नायकाचे गुणविशेष.

सक्षम बनू या

विद्यार्थ्यांनी पालक किंवा शिक्षकांच्या मदतीने कथेतील प्रमुख घटकांची माहिती घ्यावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध कथा वाचण्यासाठी उपलब्ध करून द्याव्यात.

सराव करू या

एका गावात दोन शेतकरी राहत होते. त्यांपैकी एक भाऊराव तर दुसरे बाबाराव. भाऊराव मनमिळाऊ आणि प्रत्येकाला मदत करणारे होते. याच्या उलट बाबाराव अहंकारी व भांडखोर स्वभावाचे होते. भाऊरावांना खूप मित्र होते, तर बाबारावांच्या वाटेला कुणी जात नसे. दुर्दैवाने त्या दोघांची शेते शेजारी होती. गावातले लोक भाऊरावांना म्हणत, 'बाबा रे, त्या तुझ्या शेजाऱ्यापासून सावध राहा. तो फार दुष्ट माणूस आहे. त्याच्याशी कुणी संबंध ठेवत नाही. त्याला कुणी मित्रही नाही.' त्यावर भाऊराव म्हणायचे, 'काही काळजी करू नका. एक ना एक दिवस असा येईल, की तो दुष्ट माझा मित्र होईल.' त्यांचे ते बोलणे ऐकून सारे हसत असत. एकदा बाबारावांचा मुलगा फार आजारी पडला. तेव्हा बाबाराव गावाला गेले होते. त्या गावात मोठा दवाखाना नसल्याने मुलाला तातडीने शेजारच्या गावी दवाखान्यात नेणे गरजेचे होते. मुलाची आई नेणार कशी? त्यातच जोरदार पावसाला सुरुवात झाली. बाबारावांचा स्वभाव माहीत असल्यामुळे कुणीही मदतीला आले नाही. भाऊरावांना जेव्हा ही गोष्ट समजली, तेव्हा ते पावसातही बैलगाडी घेऊन मदतीला आले. मुलाला तातडीने त्यांनी शहरात नेले.

१)कथेतील पात्रे किती व त्यांची नावे.

२) स्वभाव विशेषांची तुलना करा –भाऊराव आणि बाबुराव

३) प्रसंगाचा ओघतक्ता करा.

एकदा बाबारावांचा मुलगा फार आजारी पडला. भाऊरावांना खूप मित्र होते, तर बाबारावांच्या वाटेला कुणी जात नसे, एका गावात दोन शेतकरी राहत होते. मुलाला तातडीने त्यांनी शहरात नेले. त्यातच जोरदार पावसाला सुरुवात झाली.

ज्ञानसेवा तु साफल्यम्

दिवस १८ व १९

- **क्षेत्र / कौशल्य -** श्रवण /वाचन /लेखन
- **क्षमता -** कवितेचे वाचन समजपूर्वक करता येणे. आकलन होऊन विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करता येणे.
- **संकल्पना – पद्य**

जाणून घेऊ या -

शिक्षकांनी खालील कवितेप्रमाणे एखादी कविता घेऊन आधीच्या कविता (दिवस १-२) व या कवितेत कोणता फरक जाणवतो याविषयी चर्चा करावी विद्यार्थ्यांनी फरक समजून घ्यावा.

लेक तांबडं कुंदन, लेक हिरवं गोंदण
लेक झाडाची पालवी, लेक हाडाचं चंदन
लेक असता मनाची, सारी काळजी मिटते
लेक असता घराची, रोज समई पेटते

लेक नसता घरात, आस लागते उरास
वेळ जागीच थांबते, आणि मनही उदास
अशी चिमणी बोलकी साऱ्या घरात हसते
थोडे रागावले तर, मग रुसून बसते

सारे जगही रुसले, तरी पर्वा करू नये
पण आपली पाकळी, कधी कधी रुसू नये
फक्त लेकीला कळते, अरे निसर्गाची भाषा
काळ्या रात्रीला लागते, कशी सकाळची आशा

विद्यार्थ्यांनी कवितेचे वाचन करून कवितेचा विषय समजून घ्यावा.


- **कृती –**

१. कवितेचा विषय ----------
२. कवितेतून मिळणारा संदेश --------
३. तुमच्या दृष्टीने कवितेत आलेले अपरिचित शब्द लिहा.
४. कवितेतील यमक जुळणारे शब्द. जसे : गोंदण-चंदन

सक्षम बनू या -

विद्यार्थ्यांनी वरील कविता तालासुरात म्हणावी. मनातील विचार, भावना आपण कवितेतून व्यक्त करू शकतो हे शिक्षकांनी मुलांना या उदाहरणाद्वारे सांगावे. विचार व्यक्त करणारी आणखी एखादी कविता घेऊन कवितेतील घटकांविषयी चर्चा करावी. विद्यार्थ्यांनी कृती सोडवून कविता समजून घ्यावी.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.



शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून कविता आवेशपूर्ण स्वरात म्हणून घ्यावी.

- **कृती -**

१) कवितेत आलेले विरुद्धार्थी शब्द लिहा.
२) नारी बळकट कशा होणार आहेत?

सराव करू या -

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून कृती सोडवून घ्याव्यात.

- **कृती**

१) स्त्रिया निसर्ग वाचवण्यासाठी काय काय करणार आहेत ?
२) चौकटी पूर्ण करा -
१. सेवा यांची करणार आहेत -
२. मांगल्याची वारी येथे नेणार आहेत -
३) शिक्षण घेऊन स्त्रिया कोणकोणत्या क्षेत्रात काम करत आहेत ?
४) नारीची कोणकोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशातून शोधा किंवा शिक्षकांची मदत घ्या.


ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस २०

- **क्षेत्र / कौशल्य** - श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - विविध प्रकारचे साहित्य वाचताना (कथा, कविता, जाहिराती इ.) त्याच्या रचनेचा आस्वाद घेतात आणि त्यांबाबत आपापल्या कुवतीनुसार तोंडी, लेखी स्वरूपात विचार व्यक्त करतात. प्रसारमाध्यमे / संगणक इत्यादींवरून उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, चिकित्सक विचार करता येणे.
- **संकल्पना** – **जाहिरात**

जाणून घेऊ या -

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बाजूच्या जाहिरातीचे निरीक्षण करण्यास सांगून विद्यार्थ्यांसोबत खालील प्रश्नावर चर्चा करावी तसेच गटात चर्चा करण्यास सांगावी.



(१) जाहिरातीचा विषय कोणता आहे ?
(२) जाहिरात देणारे (जाहिरातदार) -
(३) वरील जाहिरातीत सर्वांत जास्त आकर्षित करून घेणारा घटक कोणते?
(४) जाहिरात कोणासाठी आहे ?
(५) प्रस्तुत जाहिरात विश्वसनीय आहे, असे तुम्हांला वाटते का?
(६) तुम्ही अशा जाहिराती कोठे पाहत असता?

अशी एखादी जाहिरात मुलांकडून तयार करून घेणे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे जाहिरातीचे निरीक्षण करण्यास सांगून विद्यार्थ्यांचे गट तयार करून वरील जाहिरातीतील मुद्द्यावर गटात चर्चा करण्यास सांगावी. शिक्षकांनी वरील प्रकारे प्रश्नातून विद्यार्थ्यांची जाहिरातीविषयी जाण लक्षात घ्यावी.

सक्षम बनू या

विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरांचा अंदाज घेत शिक्षकांनी वरील जाहिरात स्वतःची करायची असल्यास कशी आणखी आकर्षक आणि प्रभावी बनवाल. अशी एक जाहिरात तयार करून घ्यावी. व खालील मुद्द्याच्या आधारे चर्चा करावी.

- लक्षवेधी शब्दरचना.
- ठळकपणा व आकर्षकपणा.
- आलंकारिक, काव्यमय, प्रभावी शब्दांचा वापर.
- समर्पक व लक्षवेधी भाषा.

- ❖ ग्राहकांची बदलती आवड, सवयी, फॅशन्स व गरज यांचे प्रतिबिंब.
- ❖ जाहिरातीमध्ये संपर्क स्थळाचा पत्ता, संपर्क क्रमांक (मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) यांचा स्पष्ट उल्लेख.

वरील प्रमाणे जाहिरात तयार करून घ्यावी अशा वेगवेगळ्या प्रकारच्या जाहिराती या ठिकणी घेता येतील.

सराव करू या

विद्यार्थ्यांना त्यांनी कुठे कुठे जाहिराती पाहिल्या आहे त्यांचे विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यास सांगणे व स्वतः सुद्धा जाहिरातीचे विविध नमुने उपलब्ध करून देऊन जाहिरात वाचनाचा व लेखनाचा सराव घ्यावा.

- ○ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एखादा व्यवसाय करायचा आहे असे सांगून त्याची जाहिरात तयार करायला सांगणे .
- ○ आपल्या शाळेची प्रवेशासंबधीची जाहिरात तयार करा.
- ○ आपल्या परिसरानुसार विषय देऊन जाहिरात लेखन करायला देणे.

****

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस २१

- **क्षेत्र / कौशल्य** - श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - विविध प्रकारचे साहित्य वाचताना (कथा, कविता, जाहिराती इ.) त्याच्या रचनेचा आस्वाद घेतात आणि त्यांबाबत आपापल्या कुवतीनुसार तोंडी, लेखी स्वरूपात विचार व्यक्त करतात. प्रसारमाध्यमे / संगणक इत्यादींवरून उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, चिकित्सक विचार करता येणे.
- **संकल्पना** – **जाहिरात**

सक्षम बनू या

खालील दिलेल्या विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा .(विविध माध्यमासाठी)

ब्युटी पार्लर

शाळा उघडणार आहे त्यासाठी बुकडेपो साठी आकर्षक जाहिरात तयार करा


अशा स्वरूपाचे काही विषय देऊन जाहिरात तयार करून घेणे व जेथे अडचण येईल त्यानूसार मार्गदर्शन करणे.

सक्षम बनू या

खालील जाहिरात वाचा दिलेल्या कृती पूर्ण करा



१) खालील चौकट पूर्ण करा.



२) जाहिरातीतील काही मजकूर चुकीचा वाटतो का? सकारण नमूद करा.

३) वरील जाहिरात अधिक आकर्षक बनवण्यासाठी तुम्ही कोणकोणते बदल सुचवाल ?

४) वरील जाहिरातीचे लेखन कोणकोणत्या माध्यमातून केले जाऊ शकते त्याविषयी प्रश्नोत्तरे यांच्या माध्यमातून चर्चा घेऊन जाहिरातीचे नमुने पाहणे. व अधिक आकर्षक स्वरूपात पुनर्लेखन करून घेणे.

- **जाहिरातींसाठी अनेक माध्यमे**

  - ❖ इंटरनेट
  - ❖ चित्रपट
  - ❖ वृत्तपत्रे
  - ❖ मासिके
  - ❖ आकाशवाणी
  - ❖ दूरदर्शन

सराव करू या

शिक्षकाने दिलेल्या माध्यमांवर चर्चा करून जसे बिस्कीट,अंगाचे साबण, कपडे, या विषयीची वर पाहिलेली एखादी जाहिरात घेऊन त्याची गुणवैशिष्ट्ये यांवर चर्चा घेणे.

- ❖ शब्दांवरून जाहिरात लेखन.(सर्कस,कापड दुकान ,दवाखाना शिबीर इ.)
- ❖ जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.(आपल्या शाळेतील किंवा घरातील दैनिक पेपर मधील कात्रणे,किंवा मुलांनी आणलेल्या जाहिरातीचे वाचन व त्यावर आधारित कृती सोडवून घेणे.)
- ❖ विषय देऊन जाहिरात लेखन. जसे (पाठ्यपुस्तके सवलतीच्या दरात मिळतील)
- ❖ दिलेल्या जाहिरातीचे विविध माध्यमे वापरून अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन करणे

विविध जाहिरातीचे नमुने घेऊन त्याचे वाचन करून घ्यावे.त्यात वरील सर्व माध्यमावर येणाऱ्या जाहिरातींचा समावेश असावा. तसेच पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रमांक 70 वरील कृती

दिवस २२ / २३

- **क्षेत्र / कौशल्य**- श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - विविध प्रकारचे साहित्य जसे कथा ,कविता, ...इ.बारकाईने वाचन करून त्यांविषयी अनुमान काढतात, त्याचे विश्लेषण करतात, त्यातील प्रमुख मुद्दे शोधतात.
- **संकल्पना – नाटक (एकांकिका)**

जाणून घेऊ या

- **विद्यार्थ्यांनी पुढील नाट्य उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करावे व पुढील कृतींची उत्तरे आपल्या शिक्षक किंवा पालकांशी चर्चा करून लिहावीत.**

सर्वजण: मेंदूराजे साहेबांचा विजय असो! जयजयकार असो!

मेंदुराजे: या बसा मंडळी पोटोबा प्रधान आलेत की नाही अजून?

पोटोबा: मी केव्हाच हजर आहे महाराज.

मेंदुराजे: पोटोबा, या सर्व मंडळीची तुमच्याबद्दल तक्रार आहे,की तुम्ही अजिबात काम करत नाही, नुसत खाता आणि दुसऱ्यावर गुरगुरता.

पोटोबा: महाराज बोलताना जरा बेअदबी होतेय, कसूर माफ असावी, पण मी काम करत नाही हे म्हणन साफ खोट आहे. हो, अधूनमधून मी गुरगुरतो, पण ते यांच्यावर नाही. ती माझी सवय आहे. त्या शिवाय शरीराच राज्य सुरळीत कस चालणार? आता हेच उदाहरण घ्याना, या सर्वांनी संप पुकारला मी गप्प बसलो, पण याचा परिणाम त्यांनाच भोगावं लागला. जीवनरस मिळाला नाही म्हणून त्यांचे चेहरे बघा कसे सुकून गेलेत.

मेंदुराजे: नयनकुमार, पटलं ना सर्वांना? शिवाय असं पहा, आपण सारेच एकमेकांवर अवलंबून राहतो. आपल्या देशाच राज्य सुरळीत कसे चालणार? आपल्या देशाच राज्य चालत ते सर्वांच्या एकतेमुळे, पाय चालतात ते रस्ता डोळ्यांना दिसतो म्हणून, सर्वांची कामे होतात ती पोटोबामुळे. ए आपणास जीवनरस मिळतो म्हणून त्याने अन्न खाल्ले नाही तर काय हाल होतात. ते आता तुम्हाला समजले असेलच आपण सारेच या शरीररुपी राज्याचे सेवक आहोत. आपले हे राज्य सुरक्षित राहण्यासाठी आपण सर्वांनी एक व्हायलाच हवे खरे ना ?

सर्वजण: होय महाराज, पोटोबा आम्हाला क्षमा करा. आता नाही पुन्हा आम्ही तुमच्या विषयी कुरकुर करणार आपण सारेच या राज्याचे सेवक आहोत. आपण सारे एक आपण सारे एक.

- **कृती सोडवा व नाटक या साहित्यप्रकाराची ओळख करून घ्या.**

१) एकांकिकेचा विषय.....

२) एकांकिकेतील पात्रांची संख्या व त्यांची नावे.

३) एकांकिकेतील घटनेचे ठिकाण .----------

४) एकांकिकेतील प्रत्येक पात्राचा एक एक स्वभाव विशेष लिहा.

५) एकांकिकेतील समस्या .....

६) एकांकिका तुम्हाला विनोदी वाटते का? कसे ते स्पष्ट करा.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

सक्षम बनू या

- **विद्यार्थ्यांनी वरील प्रमाणे एकांकिका मिळवून त्याचे गटात सामुहिक वाचन करावे.पालकांनी किंवा**
- **पालकांनी शिक्षकांनी अशा एकांकिका विद्यार्थ्यांना प्राप्त करून द्याव्यात व वरील तसेच इतर कृतींच्या मदतीने नाटक या साहित्यप्रकारातील एकांकिका या साहित्यकृतीची अधिक ओळख करून द्यावी.**

सराव करू या

वरील उताऱ्याच्या आधारे पुढील कृती सोडवा .

अ) एका शब्दात उत्तर द्या.

१) एकांकिकेमध्ये ज्याच्या विषयी तक्रार केली आहे तो ----------.

२) सर्व इंद्रिय ज्याचे सेवक आहे ते राज्य

आ) कोण कोणास म्हणाले .....

१) आता नाही आम्ही तुमच्याविषयी तक्रार करणार ----------

२) सर्वांची कामे होतात ती पोटोबामुळे .

इ) स्वमत – स्वत:च्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तुम्ही करत असलेल्या गोष्टी लिहा

****

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस : २४ वा

- **क्षेत्र/ कौशल्य** :- लेखन
- **क्षमता :-** दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्ट्यपूर्ण घटना, स्थिती, अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात. (उदा. सोशल मिडीयावर लिहिणे, संपादकांना पत्र लिहिणे.) घटना, प्रसंग यांवर आधारित चिकित्सक विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.
- **संकल्पना :-** पत्रलेखन

जाणून घेऊ या

खाली पत्राचे दोन नमुने दिले आहे काय फरक आहे या दोन पत्रात काय सांगता येईल.

विद्यार्थी काय उत्तर देतात,काय चर्चा करतात? ते पहावे.

दि. ०५नोव्हेंबर २०१८

प्रति,
मा. संयोजक,
अक्षरगंधा ग्राफिक्स,
अंधेरी, मुंबई - ४०००६१

विषय : सुलेखन कार्यशाळेत सहभागी करुन घेण्याबाबत.

महोदय,
स.न.वि.वि

मी समाजविकास विद्यालय या विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकाच्या परवानगीने हे पत्र लिहित आहे. 'अक्षरगंधा ग्राफिक्स' या संस्थाद्वारे आयोजित सुलेखन कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी आमचे १० विद्यार्थी इच्छूक आहेत. आम्ही या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी खूप उत्सुक आहोत. होतकरु व प्रामाणिक विद्यार्थी या नात्याने आपण आम्हाला या सुलेखन कार्यशाळेमध्ये प्रवेश मिळवून द्यावा ही नम्र विनंती.

प्रस्तुत विनंतीला मान देऊन आपण आमच्या १० विदयार्थ्यांना सुलेखन कार्यशाळेत सहभागी करुन घ्याल या बद्दल विश्वास वाटतो.

आपला विश्वासू,
अ.ब.क.,
विदयार्थी प्रतिनिधी,
समाजविकास विद्यालय, ठाणे.

दि. २७ नोव्हेंबर २०१८

प्रिय संकेत
सप्रेम नमस्कार

'अक्षरगंधा ग्राफिक्स' आयोजित सुलेखन कार्यशाळेत तुझे सुलेखनाचे विशेष कौतुक करण्यात आले त्याबद्दल तुझे मन:पूर्वक अभिनंदन!

कार्यशाळेत सहभागी झाल्यापासून तू मन लावून सुलेखनाच्या नियमांचे बारकाईने अभ्यास केलास. आपल्या चुका सुधारुन योग्य त्या नव्या सुधारणा करत तू एका शिस्तबद्ध पद्धतीने सुलेखन आत्मसात केलास. त्याचे तुला फळ मिळाले. खूप खूप कौतुक वाटतं तुझं! कौतुकसोहळ्यात तुला मिळालेला सन्मान किती सार्थ होता. त्याचा अनुभव तुझे समारोपावेळेचे सुलेखनाचे सादरीकरण पाहताना आला. कार्यशाळेत सहभागी झाल्यामुळे माझे ज्ञान तर वाढलेच शिवाय तुझ्या सारखा चारित्र्यवान मित्र मिळाला. पुन्हा एकदा तुझे त्रिवार अभिनंदन! काका-काकूंना माझा नमस्कार सांग. तुझ्या पत्रांच्या प्रतिक्षेत आहे.

तुझा मित्र,
अ.ब.क.,
वृंदावन निवास, सोमवार पेठ,
सोलापूर - ४१३००२

- औपचारिक व अनौपचारिक पत्र म्हणून ओळखतात का?
- त्यातील फरक त्यांच्या लक्षात येतो का?
- व अशा प्रकारचे पत्र त्यांना लिहिता येते का?

हे जाणून घ्यावे . व एक पत्र लिहिण्यासाठी सांगावे.

शिक्षक विद्यार्थ्यांनी लिहिलेले पत्र गटात चर्चेसाठी घेतील तसेच वर्गात सुद्धा यावर चर्चा करून घेतील. पत्राच्या प्रकारानुसार ते कोणते याविषयी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून फरक स्पष्ट करून देतील. औपचरिक पत्राविषयी चर्चा करून घेतील.

सक्षम बनू या

औपचारिक पत्र
१. प्रति, लिहिल्यानंतर व्यक्तीचा हुद्दा समर्पक लिहिणे. २. पत्राचा विषय लिहिणे. ३. अचूक शब्दांत नेमका आशय मांडणे. ४. पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे.

शिक्षक मुलांच्याच मदतीने एक औपचरिक पत्र लिहून घेतील. औपचरिक पत्र व, उपरोक्त निकषावर चर्चा करून घेतील.

सराव करू या

काही विषय देऊन,प्रारूप देऊन काही पत्र लिहून घेणे.

पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता
दिनांक :

प्रति,
माननीय.....,
(योग्य त्या मान व पदासह ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे नाव, हुद्दा व पत्ता)

विषय : ..... (पत्राचे कारण)

महोदय,

विषयानुसार मजकूर

आपला विश्वासू,
पत्र पाठवणाऱ्याची सही
व नाव

तिकीट

प्रति,

प्रेषक,

(**प्रति –** ज्याला पत्र पाठवायचे ती व्यक्ती,
प्रेषक – जो पत्र पाठवतो ती व्यक्ती.)

कृती– वरील प्रारूपाचा अभ्यास करून खालील विषयावर पत्रलेखन करा.

तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.

सध्याच्या काळाचा विचार करता आपण पत्रव्यवहार हा whatsapp, mail, तसेच अनेक प्रसार माध्यमे यांच्या मदतीने करतो तर आपण त्यावर पत्रव्यवहार कसा करतो याचे काही नमुने तयार करा.

दिवस २५ वा.

- **क्षेत्र / कौशल्य** :- **लेखन**
- **क्षमता :-** दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्ट्यपूर्ण घटना, स्थिती, अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात. (उदा. सोशल मिडीयावर लिहिणे, संपादकांना पत्र लिहिणे.) घटना, प्रसंग यांवर आधारित चिकित्सक विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.
- **संकल्पना** :- **पत्रलेखन**


जाणून घेऊ या

शिक्षक विद्यार्थ्यांना एक विषय देतात. उदा. शाळेच्या बाहेर पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन लिकेज झाली आहे. त्यामुळे जाण्या-येण्याच्या रस्त्यात पाणी साचत आहे. त्यासाठी ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका प्रमुखांना अर्ज करा.

सदर पत्राचा विषय कोणत्या प्रकारचे आहे ?

शिक्षकांनी विद्यार्थांनी लिहिलेले औपचारिक पत्र निकषानुसार जाणून घेतील व मार्गदर्शन करतील.

तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र email द्वारे वर्गशिक्षकांना कसे लिहिता येईल ते लिहा.



पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता
दिनांक :

प्रति,
माननीय.....,
(योग्य त्या मान व पदासह ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे नाव, हुद्दा व पत्ता)

विषय : ..... (पत्राचे कारण)

महोदय,

विषयानुसार मजकूर

आपला विश्वासू,
पत्र पाठवणाऱ्याची सही
व नाव

शिक्षक वरीलप्रमाणे एका औपचारिक पत्राचे प्रारूपावरून प्रत्यक्ष पत्र लेखन करून घेऊन मार्गदर्शन करतील. त्यासाठी विविध विषय घेतील. तसेच email वर सुद्धा हेच पत्र कसे लिहायचे याविषयी मार्गदर्शन करतील.

सराव करू या

औपचारिक पत्राचे विविध विषय देऊन पत्रलेखनाचा सराव करून घ्यावा. उदा. तुमच्या शाळेच्या बाहेर पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन लिकेज झाली आहे. त्यामुळे जाण्या-येण्याच्या रस्त्यात पाणी साचत आहे. त्यासाठी ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका प्रमुखांना अर्ज करा.

दिवस : २६ वा.

- **क्षेत्र / कौशल्य :- लेखन**
- **क्षमता :-** दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्ट्यपूर्ण घटना, स्थिती, अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात. (उदा. सोशल मिडीयावर लिहिणे, संपादकांना पत्र लिहिणे.) घटना, प्रसंग यांवर आधारित चिकित्सक विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.
- **संकल्पना :- पत्रलेखन**

जाणून घेऊ या

शिक्षक विद्यार्थ्यांना एक स्व-परिचय पत्राचा नमुना लेखनास देतील व एक स्व परिचय पत्र लिहून घेतील.

संबंधित विषयासाठी स्व-परिचय पत्र तयार करा.

महात्मा फुले विद्यालय बुलढाणा
आंतरशालेय नाट्यमहोत्सवातील स्पर्धांसाठी
एकपात्री प्रयोग कलाकारांची निवड
इच्छुक विद्यार्थ्यांकडून स्व-परिचयपत्र
मागविण्यात येत आहे.
अंतिम दिनांक दि.२६ डिसेंबर
नाट्यविभाग प्रमुख
पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक

स्वपरिचय पत्राचे मुद्दे

(१) संपूर्ण नाव
(२) पत्ता
(३) संपर्क क्रमांक
(४) जन्मतारीख
(५) शैक्षणिक पात्रता/विशेष प्रशिक्षण
(६) छंद
(७) अनुभव/पारितोषिके
(८) इतर कलांमधील प्रावीण्य

विद्यार्थी वरील पत्र लिहिल्यानंतर त्याचे निरीक्षण करतील.शिक्षक मार्गदर्शन मार्गदर्शन करतील.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थांनी लिहिलेले स्व-परिचय पत्र निकषानुसार जाणून घेतील व मार्गदर्शन करतील. तसेच सध्या असे पत्र कोणकोणत्या ठिकाणी व कशासाठी पाठवले जाते? तसेच कोणकोणत्या कशाच्या माध्यमातून पाठवले जातात? यावर चर्चा घेतील व विद्यार्थ्यांकडून विषय देऊन पत्र लिहून घेतील.

सराव करू या

स्व-परिचय पत्रासोबतच औपचारिक पत्राचे विविध विषय देऊन पत्रलेखनाचा सराव करून घ्यावा. प्रसार माध्यमाचा उपयोग करून कसे संदेश पाठवतो त्याचा सराव घेणे. सरावासाठी पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रं ६४ वरील कृतीचा सुद्धा सराव घ्यावा.

दिवस २७ /२८ वा.

- **क्षेत्र/ कौशल्य** – लेखन / वाचन
- **क्षमता** - लेखनात विरामचिन्हांचा वापर करता येणे.
- **संकल्पना** – **विरामचिन्हे -** प्रश्नचिन्ह, उद्‌गारचिन्ह, अवतरणचिन्ह

जाणून घेऊ या

१) आज घरी कोण येणार आहे ?
२) शाब्बास ! तू सुंदर खेळलास !
३) वैष्णवीने ' निसर्ग रक्षणाची ' हाक दिली.
४) ॲरिस्टॉटलच्या मते ,' मनुष्य हा समाजशील प्राणी आहे'.
५) राघव म्हणाला ,"बाबा आज मी तुम्हाला प्रयोग दाखवणार आहे".

विद्यार्थ्यांनी वरील वाक्याचे समजपूर्वक वाचन करावे व पुढील कृतींची उत्तरे लिहावीत.

१) वाक्यातील प्रश्न.....
२) वाक्यातील उद्‌गार.....
३) वाक्यातील महत्त्वाच्या शब्दांवर दिलेला जोर ....
४) वाक्यात व्यक्त केलेले मत .....
५) बोलणाऱ्या तोंडचे शब्द.

वरील कृतींच्या आधारे विद्यार्थ्यांनी प्रश्नचिन्ह, उद्‌गारवाचक चिन्ह आणि अवतरण चिन्ह यांची संकल्पना समजून घ्यावी.

सक्षम बनू या

१) आज शिक्षक घरी येणार होते का ?
२) अरे बापरे परत तिसरी लाट येणार ! हे काय ऐकतोय मी !?
३) श्रीपाद 'ठेविले अनंते तैसेची रहावे' हे वचन नेहमी म्हणत असे .
४) हिराबाईंच्या मते, ' मुलांनी नेहमी अभ्यास प्रवण असावे'.
५) दिगंबरराव म्हणाले, "आज आपण सर्वजण शेवभाजी खाणार आहोत."

विद्यार्थ्यांनी वरील वाक्यात ठराविक ठिकाणी आलेली विरामचिन्हे का आली असावीत हे समजून घेण्याचा प्रयत्न करावा. शिक्षकांनी वरील वाक्य विद्यार्थ्यांना वाचायला सांगावीत. वरील वाक्यात प्रश्न कोठे विचारलेला आहे? उद्‌गार कोठे आहे , कोणत्या शब्दांवर जोर दिला आहे आहे, कोणत्या वाक्यात मत मांडण्यात आले आहे, बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द कोणत्या चिन्हांनी दाखवले आहे यासंदर्भात सविस्तर गटचर्चा घडवून आणावी. या चर्चेतून विद्यार्थ्यांना प्रश्नचिन्ह, उद्‌गारचिन्ह आणि अवतरण चिन्ह यांच्या व्याख्या तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे.

सराव करू या

प्रश्नचिन्ह, उद्‌गारचिन्ह आणि अवतरणचिन्ह यांचे उपयोग विद्यार्थ्यांनी स्वत:च्या शब्दांत सांगावेत.

खालील विरामचिन्हे ओळखून त्यांच्या पुढे त्यांचे नाव व त्यांचा वाक्यातील उपयोग लिहावा.

१) :- ? , २) : - ' ..... '
3) :- ! , ३) : - " ..... "

दिवस २९ वा

- **क्षेत्र -** लेखन व वाचन
- **क्षमता** - व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांच्या लेखनात योग्य वापर करतात.
- **संकल्पना – शब्दाची जात**

जाणून घेऊ या –

विद्यार्थ्यांनी दोन गोलात दिलेल्या शब्दांचे वाचन करून त्या शब्दांचे शब्दांच्या नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद , क्रियाविशेषण, शब्दयोगी,उभयान्वी, केवलप्रयोगी अव्यय, या जातीत वर्गीकरण करावे.

वाडा, नलिनी, मी, करतो, चार, तुम्ही, उंदीर, गोडवा, तो, पडतो, फुल,जातो, हिमालय, आहेत, होता, असेल.

आज, अरेरे, तिथे, शब्दावर, त्याच्यासाठी आणि, टेबलाखाली, अथवा, शाब्बास, पूर्वी

विद्यार्थ्यांनी वरील प्रत्येक शब्दांचे वर्गीकरण करताना कोणते निकष लावले याची आपल्या शिक्षकांशी, पालकांशी किंवा मित्राशी चर्चा करावी.

सक्षम बनू या

विद्यार्थ्यांनी पुढील दिलेल्या शब्दगटांचे वाक्य तयार करा व कंसात शब्दांच्या जातीतील कोण कोणते प्रकार आलेले आहे ते लिहा.तसेच त्या शब्दांचे विकारी व अविकारी या प्रकारात वर्गीकरण करा.

१) राधा, तोडले, फुल, गुलाब
२) समीर, मात, शाब्बास, तू , केली, संकटावर
३) खूप, पाऊस, पूर्वी, पडायचा .

शिक्षकांनी शब्द जाती कशा आल्या याची चर्चा विद्यार्थ्यांशी करून प्रत्येक शब्द जातीची वैशिष्ट्ये समजून घेण्यास मदत करावी.

सराव करू या

विद्यार्थ्यांनी पुढे दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखून त्याचा उपप्रकार सांगावा.

१) वडिलांनीही माझ्या पाठीवरून हात फिरवला.
२) दोन गाड्या गडाच्या पायथ्याशी हजर झाल्या.
३) अरे बाप रे! केवढी मोठी आग लागली आहे.

खाली दिलेल्या चौकटीत काही क्रियाविशेषण अव्यय लपलेली आहे ती ओळखून लिहा.

ह	ळू	थो	डे	आ	रो
आ	ज	डा	मो	ज	के
ज	रा	सा	व	का	श
त	सा	जि	र	ल	ही
अ	ने	क	दा	चि	त
ति	क	डे	खा	ली	र

दिवस ३० वा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे ब्रिज कोर्स चाचणी क्र. २

विषय: मराठी (द्वितीय भाषा)

इयत्ता – नववी गुण – १५

विद्यार्थ्याचे नाव : .....

१. पुढील पद्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

अ) १) पुढील गोष्टीच्या प्रत्येकी दोन बाबी लिहा व तक्ता पूर्ण करा – २

लेक घरात असताना	लेक घरात नसताना
१)	१)
२)	२)

लेक तांबडं कुंदन,लेक हिरवं गोंदण
लेक झाडाची पालवी, लेक हाडाचं चंदन
लेक असता मनाची, सारी काळजी मिटते
लेक असता घराची, रोज समई पेटते

लेक नसता घरात, आस लागते उरास
वेळ जागीच थांबते, आणि मनही उदास
अशी चिमणी बोलकी साऱ्या घरात हसते
थोडे रागावले तर, मग रुसून बसते

सारे जगही रुसले, तरी पर्वा करू नये
पण आपली पाकळी, कधी कधी रुसू नये
फक्त लेकीला कळते, अरे निसर्गाची भाषा
काळ्या रात्रीला लागते, कशी सकाळची आशा

आ)

१) एका वाक्यात उत्तर लिहा – १
कवीच्या मते मुलीच्या बाबतीत पालकांनी कोणती काळजी घ्यावी?

२) एका शब्दात उत्तर द्या. पाकळी कोणाला म्हटले आहे? १

३) अशी चिमणी बोलकी साऱ्या घरात हसत- या काव्यपंक्तीचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. २

४) शब्दांचे अर्थ लिहा – १) उरास २
२) उदास

व्याकरण -

अ) वाक्यात आलेली विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा. १

साई, काय करायचे तुझे तू ठरव,जाऊ का मी आता ?

आ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखा -

अ) ती शेंगाच्या वावरात शिरली . १

ब) कालपासून धो धो पाऊस कोसळत होता. १

उपयोजित लेखन –

२. खालील जाहिरातीचे वाचन करून दिलेल्या कृती सोडवा . ४



१. जाहिरातीचा विषय ---------- -

२. जाहिरातीतील वस्तू मिळण्याचे ठिकाण.....

३. जाहिरातीमधील विशेष बाब (ग्राहकाला आकर्षित करून घेण्यासाठी) .....


४. वस्तूचे विशेष .....

दिवस ३१ / ३२ /३३

- **क्षेत्र / कौशल्य** - श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - साहित्य समीक्षा रसास्वाद स्वानुभव लेखन संदर्भासाठी कोश हाताळण्याचा सराव इ.
- **संकल्पना** - साहित्य समीक्षा, रसास्वाद स्वानुभव लेखन.

जाणून घेऊ या -

शिक्षकांनी अवांतर संदर्भ साहित्याचा आधार घेऊन पुढील प्रमाणे काही उतारे निवडावेतत्यांचे वर्गात प्रकट वाचन . .छोट्या कृती तोंडी सोडवून घ्याव्यात नंतर त्याचे वहीत लेखन करण्यास सांगावे-घेऊन त्यावर आधारित छोट्या



कोकणातल्या समुद्रकिनाऱ्याजवळच्या एका गावी सहज सहलीसाठी गेलो होतो. सोबत परिवार होता. निसर्गाच्या सहवासात दोन दिवस रहावं, जरा परिसर बदल अनुभवावा असं काहीसं मनात होतं आणि तसंच घडत होतं. आम्हा साऱ्यांची मनं मोकळा अवकाश पाहून फुलून आली होती. कौलारू छपरांची घरं, अंगणपरसातली माडापोफळींची, फणसांची झाडं, लाल मातीच्या पायवाटा, समुद्राची अखंड गाज आणि हवेत तरळणारा एक समुद्रकाठच्या गावमातीचा गंध... मन थाऱ्यावर होतं आणि नव्हतंही.

संध्याकाळची वेळ होती. वर्दळ नसलेला समुद्र किनारा, दूरवर पसरलेली फिकट पिवळ्या वाळूची ओलसर पुळण. उन्ह कलतं झालेलं. समुद्राच्या उसळत्या लाटा सोनेरी रंग माखून किनाऱ्याकडं परतत होत्या. समुद्रावर दूर क्षितिजाच्या पलीकडं तो तेजाचा गोळा केशरी झालेला होता. साऱ्या वस्तुमात्रावर एक विलक्षण मोहिनी पसरलेली. काही पर्यटकांचे, तरुण मुलांचे सूर्यास्ताचा फोटो काढण्याचे प्रयत्न चाललेले. सूर्य अथांग पाण्यात बुडतानाचे दृश्य पाहताना शब्द मावळले. दिठीनं खोल आत घेतलेला तो एक नितांत सुंदर सूर्यास्ताचा देखावा मनात उरला.

मी आता पायांतल्या चपला काढून पुळणीवर ठेवल्या. साऱ्यांतून स्वतःला बाजूला सारून समुद्राचा झालो. मला वाटलं, एक अपार मोकळीक आणि असीम सुंदरता माझ्या आत आणि बाहेर पसरलीय. आणि तीच सर्वदूरही आहे.

कृती -

१) कोकण सौंदर्यातील लेखकाने टिपलेली सौंदर्यस्थळे सांगा.

२) ' माणसाला निसर्ग सहवासाची ओढ आहे ' याविषयी तुमचे मत सांगा.

३) तुम्ही अनुभवलेल्या अशा सुंदर क्षणांचे वर्णन करा.

४) प्रस्तुत उताऱ्यातील तुम्हाला वाटलेल्या अपरिचित शब्दांची यादी करा.

५) उताऱ्यातील तुम्हाला आवडलेली वाक्ये लिहा.

६) 'साऱ्यांतून स्वतःला बाजूला सारून समुद्राचा झालो' या वाक्याचे चिंतन करा. मनात येणारे विचार शब्दात मांडण्याचा प्रयत्न करा.

७) उताऱ्यात आलेले वाक्प्रचार शोधून त्यांचा अर्थ व वाक्यात उपयोग करा.

८) उताऱ्यास समर्पक शीर्षक द्या.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

'स्थूलवाचन' या नवीन विभागाची तोंडओळख' शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जरूर करून द्यावी

उदा.

पाठ्यपुस्तकातील 'स्थूलवाचन' या नवीन विभागाशी तुम्हाला गट्टी करायचीच. तुम्हाला चिकित्सक विचार करायला लावणारा, लिहितं करणारा हा विभाग आहे. खरंतर स्थूल म्हणजे साधारण; वरवरचं असं पण येथे केवळ स्थूलवाचन न करता दिलेल्या घटकाचा सखोल, सुक्ष्म अभ्यास तुम्ही करायचा आहे. प्रवासवर्णन, वैचारिकलेख, कोश वाङ्मय आदींचा या विभागात समावेश असतो.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील उताऱ्याचे मौन वाचन करण्यास सांगावे. सरावासाठी ९ वी स्थूलवाचनाच्या आधारे अशा प्रकारचे नमुना उतारे तयार करावेत. प्रारंभी दोन कृती सोडवण्यास द्याव्यात. उताऱ्यावर आधारित किमान चार ते पाच कृती तयार करण्यास प्रोत्साहित करावे.



एक दिवस मी या उद्यानातून त्या उद्यानात भटकत भटकत सेंट जेम्स बगिच्यात पोचले व तळ्यातील पोहणाऱ्या पक्ष्यांकडे पाहत होते. सगळीकडे मंद रुपेरी प्रकाश पडला होता. एकाएकी मला चमत्कारिक वाटले, की प्रकाश खालून वर फाकला आहे. मी परत नीट भोवताली व वर पाहिले. खरेच आकाश अभ्राच्छादित होते. अगदी काळे जरी नसले तरी सूर्याचा मागमूसही नव्हता. खाली तळ्याच्या पाण्यावर व मधल्या दगडावर बर्फाचा पातळ थर साचला होता व त्यातून परावर्तन पावून प्रकाश सर्वत्र फाकला होता. यामुळे प्रकाश खालून वर गेल्यासारखा वाटला. या विशिष्ट प्रकाशात सर्वच रंग आंधळे वाटतात. कधी एखाद्या दिवशी सूर्यप्रकाश पडला व तोही वसंतऋतूत फुलांनी बहरलेल्या ताटव्यावरून व हिरव्या कुरणावरून पडला, म्हणजे रंगाने नटलेली सृष्टी डोळ्यांपुढे नाचते; पण तरीही येथल्या सृष्टीतले रंग व आपल्याकडच्या सृष्टीतील रंग यांत फरक आहे. येथे सर्वच रंग जरा मंद व सौम्य वाटतात. जशा दाट छाया; पण आपापल्या भडकपणाने उठून न दिसता एकमेकांना पूरक अशा भासतात.

कृती-

१) लेखिका फिरावयास गेली ते ठिकाण कोणते ते सांगून चित्राच्या आधारे त्याचे वर्णन करा.

२) उताऱ्याच्या आधारे विधान पूर्ण करा.

अ) तळ्यात पोहणारे पक्षी---

ब) 'रूपेरी' ला पर्यायी शब्द ----

क) ढगांसाठी उताऱ्यात आलेला शब्द----

ड) वसंतऋतूत फुलणारे दोन फुले ---

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

वरील उताऱ्यातील अपरिचित शब्दांचे अर्थ सांगा – उद्यान, अभ्राच्छादित ,मागमूस, कुरण ,नटणे, या शब्दांच्या अर्थासाठी आपल्याला मदत घ्यावी लागेल शब्दकोशाची .

विद्यार्थी मित्र हो, स्थूलवाचन या भागामध्ये आपण विविध साहित्य प्रकारचे लेखन याविषयी चर्चा केली किंवा समजून घेतले, लेखक आपल्या मनातील विचार, भावना ,आलेले अनुभव,पाहिलेले प्रसंग, शब्दाच्या माध्यमातून गुंफतात, परंतु त्यातील कशी शब्द असे असतात की जे आपल्याला अपरिचित असतात. शिक्षक किंवा पालकांच्या मदतीने आपण त्याचा अर्थ शोधतो, जाणून घेतो परंतु कधी कधी त्यांच्याकडेही त्याचे उत्तर नसते अशावेळेस प्रश्न पडतो कुणाची मदत घ्यायची ? आपल्या मदतीला येतो तो शब्दकोश .....





- विद्यार्थ्यांनी वरील चित्रांचे निरीक्षण करावे. तुमच्या वाचनात आलेले परंतु अर्थ न समजलेले शब्द पाह्यला मिळतात का याची चर्चा करावी .

कृती – १) पाणी आणि पाणि या दोन शब्दांचे अर्थ सांगा .

२) प्रति व प्रती या शब्दांचे अर्थ .....

शब्दकोश म्हणजे ज्याच्यामध्ये प्रत्येक अक्षराचे अनेक शब्द व त्या शब्दांचे विविध अर्थ असतात.अशा शब्दांच्या संग्रहाला शब्दकोश असे म्हटले जाते. शब्दकोश हे भाषेच्या व साहित्याच्या अभ्यासाचे एक प्रमुख साधन आहे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शब्दकोशाची गरज व महत्त्व समजून घेण्यासाठी मदत करावी. साहित्य समजून घेण्यासाठी शब्द कोश कशी मदत करतो हे समजून द्यावे. शब्दांच्या अर्थाकडून शब्दाच्या व्युत्पत्तीकडे घेऊन जावे.

सराव करू या

शिक्षकांनी पुढील व्यंगचित्राप्रमाणे काही व्यंगचित्रे संकलित करावी. चित्रपट्ट्यांचे वर्गात गटनिहाय वाटप करावे. विद्यार्थ्यांना आपापसात त्या चित्राविषयी चर्चा करण्यास प्रेरित करावे. नंतर स्वतंत्रपणे चित्रावर आधारित त्यांना किमान एक परिच्छेद लिहिण्यास सांगावा. ही विद्यार्थ्यांची स्वतंत्र अभिव्यक्ती असल्याने त्यांना येणाऱ्या शंकांचे निरसन करावे लिहिण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करावा.



कृती १ -

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील प्रकारच्या हास्यचित्रांचे संकलन करण्यास सांगावे. स्वतंत्रपणे हास्यचित्रे तयार करण्यास प्रोत्साहित करावे.

अ)



ब)



कृती २ -

मुलांनो हे चित्र बारकाईने पाहा. याविषयी आंतरजालावरून अधिक माहिती मिळवा आणि थोडक्यात वहीत लिहा. 'विश्वकोश गौरवगीत' शोधून ते लिहा



प्रशिक्षण परिषद, पुणे.

****

दिवस ३४ / ३५

- **क्षेत्र / कौशल्य** - श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्याचे आकलन होणे. त्यातील आशयावर लेखन करता येणे.
- **संकल्पना** - **पद्य**

जाणून घेऊ या -

शिक्षकांनी खालील अभंगा प्रमाणे एखादा अभंग घेऊन या काव्य प्रकाराबाबत चर्चा करावी. विद्यार्थ्यांनी अभंग व इतर कविता यातील फरक समजून घ्यावा

ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ।।
अंगा लावूनिया राख । डोळे झांकुनी करिती पाप ।।
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ।।
तुका म्हणे सांगो किती । जळो तयांसी संगती ।।

- **कृती -**

१) साधूंच्या खोटेपणाबद्दल कोणता शब्द वापरला आहे ?
२) वरील अभंग कोणी लिहिला आहे ?
३) कोणाची संगत धरू नका असे सांगितले आहे?

शिक्षकांनी अशा उदाहरणातून अभंग हा काव्यप्रकार समजून सांगावा. विद्यार्थ्यांनी अभंग या काव्य प्रकाराचे वेगळेपण जाणून घ्यावे.

सक्षम बनू या -

विद्यार्थ्यांनी अभंग चालीवर म्हणण्याचा प्रयत्न करावा. संतांच्या अभंगातील विविध विषयावर शिक्षक / मित्रांसोबत चर्चा करावी. अभंगावर आधारित कृती सोडवाव्यात.

चंदनाच्या संगे बोरीया बाभळी।
हेकळी टाकळी चंदनाची ।।
संतांचिया संगे अभाविक जन ।
तयाच्या दर्शनें तेचि होती।।
चोखा म्हणे ऐसा परमार्थ साधावा ।
नाही तरी भार वाहावा ऐसा।।

- **कृती -**

१. अभंगात आलेल्या झाडांची नावे लिहा.
२. संत चोखामेळा कोणाचे दर्शन घेण्यास सांगत आहेत ?

सराव करू या -

विद्यार्थ्यांनी अभंगाच्या आधारे कृती सोडवाव्यात.

- **कृती**

१) दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द अभंगातून शोधून लिहा -
१. भाविक x ---------- , २. स्वार्थ x ----------
२) "संगे" या शब्दाचा अर्थ लिहा -
३) बोरी, बाभळी कोणामुळे सुगंधित होतात ?
४) तुमच्या मित्रांचे चांगले गुण लिहा किंवा तुम्ही तुमच्या मित्रांकडून घेतलेला चांगला गुण लिहा-

दिवस ३६ / ३७ वा.

- **क्षेत्र / कौशल्य** – वाचन व लेखन
- **क्षमता** - विद्यार्थी विविध विरामचिन्हे लेखनात उपयोगात आणतात.
- **संकल्पना** – **विरामचिन्हे (संयोग चिन्ह, अपसारण चिन्ह)**

जाणून घेऊ या -

विद्यार्थ्यांनी खालील शब्द व वाक्य जाणीवपूर्वक वाचावीत.

१) राष्ट्र-प्रतिनिधी.
२) मोर बागेत नाचताना सुंदर दिसतो-
३) मी शेतीविषयी बोलायला गेलो, पण -
४) जी - इयत्ता उत्तीर्ण करायची होती- ती झालीच नाही.

शिक्षकांनी वरील वाक्य विद्यार्थ्यांना वाचायला लावावीत व खालील प्रश्न विचारून त्यांना वरील वाक्याच्या संदर्भाने निरीक्षण नोंदवण्यात सांगावे.

१) दोन शब्द जोडलेले कोठे आढळतात ?
२) ओळीच्या शेवटी कोणत्या वाक्यात शब्द अपुरा राहिला आहे ?
३) बोलताना विचारांची मालिका कोणत्या वाक्यात तुटल्यासारसारखी आढळते ?
४) लेखक कोणत्या वाक्यात स्पष्टीकरण देताना आढळतो आहे ?

शिक्षकांनी वरील प्रश्नांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाक्यात दोन शब्द जोडताना कोणते चिन्ह उपयोगात आणले जाते, ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास कोणते चिन्ह वापरतात, बोलता बोलता विचार मालिका तुटल्यास कोणते चिन्ह वापरतात, बोलताना स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यास कोणते चिन्ह उपयोगात आणतात, या चिन्हांच्या खुणा कशा असतात यासंदर्भात सविस्तर चर्चा करावी.

सक्षम बनू या

१) राज्य-प्रतिनिधी.
२) मनीषा रोज झाडांना पा-
णी घालते.
३) तो गेला, पण -
४) जो -आकाश पाळणा.

विद्यार्थ्यांनी वरील वाक्यांचे नीट निरीक्षण करावे कोणत्या ठिकाणी शब्द जोडलेला आहे. वाक्य अर्धवट राहिल्यास कोणत्या स्वरूपाचे चिन्ह दिले आहे. विचारांची मालिका तुटल्यास कोणत्या स्वरूपाचे चिन्ह दिले आहे. एखाद्या गोष्टीचे स्पष्टीकरण देत असताना कोणत्या स्वरूपाचे चिन्ह उपयोगात आणले आहे. याचे आकलन करावे. आकलन केल्यानंतर सदरील चिन्हांचा उपयोग आपल्या लेखनात करून पाहावा.

सराव करू या

प्रश्न

१) संयोग चिन्ह कोणत्या खुणेने दाखवले जाते ?
२) अपसारण चिन्ह कोणत्या खुणेने दाखवले जाते ?
३) संयोग चिन्ह वाक्यात केव्हा दिले जाते ?
४) अपसारण चिन्ह वाक्यात केव्हा दिले जाते ?
५) संयोग चिन्ह व अपसारण चिन्ह व त्यांच्या व्याख्या तुमच्या शब्दांत तयार करा.

शिक्षकांनी वरील प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांकडून तयार करून घ्यावीत. आवश्यक तेथे गटचर्चा वा वैयक्तिक चर्चेचे नियोजन करावे.

ज्ञानसेवा तु साफल्यम्
प्राशिक्षण परिषद, पुणे.

दिवस ३८ / ३९ वा.

- **क्षेत्र / कौशल्य** - लेखन
- **क्षमता** - घटना प्रसंग स्वतः अनुभवलेल्या व्यक्ती, प्रसंगाचे, स्थळाचे दृश्याचे घेतलेल्या अनुभवाचे नेमकेपणाने वर्णन करता येणे.
- **संकल्पना** - **वर्णनात्मक निबंध**

जाणून घेऊ या –

विद्यार्थ्यांनी पुढील चित्र बारकाईने पाहा आणि त्या चित्राविषयी तुमच्या मनात येणारे विचार सांगा.



मुलांनो पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, प्रसंगाचे, अनुभवाचे शब्दचित्र नेमकेपणाने रेखाटणे या प्रकारच्या निबंधात अभिप्रेत आहे. अशा प्रकारच्या लेखनासाठी सूक्ष्म निरीक्षणशक्ती आवश्यक असते. या प्रकारच्या निबंधात तुम्ही अनुभवलेल्या प्रसंगाचे वर्णन करणे आणि त्याला कल्पकतेची जोड देऊन लेखन करावे लागते. चला तर आपण या चित्राचे नेमकेपणाने व कल्पकतेने लेखन करू या.

शिक्षकांनी पुढील क्रमाने विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान तपासावे.

विद्यार्थ्यांचे निरीक्षण
विद्यार्थ्यांचा अनुभव
भावना, विचार, वर्णन यांचे छोटया छोटया वाक्यांमध्ये तो करीन असलेली मांडणी .
त्याची शब्दसंपत्ती.
चित्राचे अवलोकन व स्वतःच्या अनुभवातून वर्णनात्मक लेखना पर्यंतचा प्रवास.

सात-आठ विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे वर्गाचे गट करावेत. प्रत्येक गटात स्वतंत्र चित्र देऊन परस्परात चर्चा करून संवाद साधण्यास सांगावे. चित्रांच्या अनुषंगाने काही नवीन शब्द देऊन त्यांच्या मनात कोणत्या भावना, विचार निर्माण झाले याचे जिवंत व प्रत्ययकारी वर्णन सोप्या व नेमक्या भाषेत करण्यास प्रेरित करावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी वर्णनात्मक निबंध लेखनाची संकल्पना अधिक दृढ करण्यासाठी पुढील गोष्टी कराव्यात –

- मुलांनी लिहिलेल्या वरील चित्रांचे केलेल्या वर्णनाचे प्रकट वाचन करण्यास सांगावे.
- वर्णनात्मक या निबंधलेखनाबद्दल माहिती देणे.
- 'वर्णनात्मक' या लेखनप्रकाराची वैशिष्ट्ये सांगावीत.
- गटात वर्णनात्मक लेखनाची चर्चा करावी.
- विद्यार्थ्यांकडून काही कृती सोडवून घ्याव्यात.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक वर्णनात्मक निबंध लिहायला सांगावा. त्यात खालील मुद्द्यांचा विचार व्हावा.

- वर्णन कोणत्या गोष्टीचे, प्रसंगाचे, घटनेचे, अनुभवाचे करायचे याची स्पष्ट कल्पना लेखनातून यावी.
- एखाद्या प्रसंगाचे वर्णन तुम्ही प्रत्यक्ष ऐकले असेल, दुसऱ्या व्यक्तीचे अनुभव ऐकले असेल त्याचा उपयोग करून तो प्रसंग विद्यार्थी स्वतःच्या शब्दात मांडणी करतात.
- विद्यार्थी कल्पनेने निबंधात भाषाशैलीच्या आधारे रंग भरतात.

सराव करू या

माझा आवडता प्राणी

- प्राण्याचे नाव व वर्णन
- खाद्य, राहण्याचे ठिकाण
- उपयोग
- आवडण्याचे कारण
- त्याच्याविषयीं संवेदनशीलता.

****

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस ४० वा.

- **क्षेत्र / कौशल्य - लेखन**
- **क्षमता** - वाचन लेखनाचा उद्देश लक्षात घेऊन आपले विचार प्रभावीपणे लिहितात. दिलेल्या विषयावर स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे
- **संकल्पना - वर्णनात्मक निबंध**

जाणून घेऊ या

वर्णनात्मक निबंधासाठी शिक्षक एक विषय देऊन त्याचे मुद्दे देतील व काही मुद्द्यांवर चर्चा घेतील. उदा. **माझी शाळा**



- शाळेचे नाव व वर्णन
- शाळेविषयीच्या भावना मनातील विचार/
- शाळेतून तुम्हांला मिळणारे संस्कार, ज्ञान
- शाळेविषयी वाटणारा जिव्हाळा
- शाळा आवडण्याचे कारण

सक्षम बनू या

शिक्षकांनी वर्णनात्मक लेखनाची संकल्पना मुलांना कितपत समजली हे पाहण्यासाठी मुलांनी लिहिलेल्या वर्णनात्मक लेखनावर पुढील गोष्टी कराव्यात.

- मुलांनी लिहिलेल्या वरील विषयावरील वर्णनात्मक निबंधाचेप्रकट वाचन करण्यास सांगावे.
- वर्णनात्मक या लेखन प्रकाराबद्दल माहिती देणे.
- वर्णनात्मक लेखन प्रकाराची वैशिष्ट्ये सांगावीत.
- गटात वर्णनात्मक लेखनाची चर्चा करावी.
- विद्यार्थ्यांकडून काही कृती सोडवून घ्याव्यात.

मुलांनी लिहिलेल्या वर्णनात्मक निबधाचे गटात किंवा 'वर्गात वाचन करून घेऊन मार्गदर्शन करावे. त्या लिखाणाचे प्रदर्शन अथवा हस्तलिखित तयार करावे त्यामुळे विद्यार्थांन प्रोत्साहन मिळेल व मुले अधिकाधिक चांगले निबंधलेखन लिहू लागतील.

सराव करू या

निबंध लेखन लिहू या

माझा आवडता खेळ

- खेळाचे नाव व वर्णन
- तो कसा खेळला जातो

ज्ञानगंगा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

- तो खेळ का आवडतो
- तुमचे प्रेरणास्थान
- त्या खेळातील तुमचे कौशल्य
- खेळत मिळणारा आनंद

माझी ऑनलाईन शाळा

- ऑनलाईन शाळेची सुरुवात कशी झाली
- ऑनलाईन शाळेतील अनुभव सर्व विषयांचे आकलन नीट होते का
- ऑनलाईन शिक्षण आवडते का
- ऑनलाईन शिक्षणविषयीं स्वतःचे मत.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भावजीवनाशी निगडीत विषय द्यावे व लेखनाचा सराव करून घ्यावा.

उदा. माझी आनलाईन शाळा, माझा आवडता खेळ, मी अनुभवलेली सहल .

असे अनेक प्रसंगाचे निरीक्षण करण्यास सांगावे, वर्णन करण्यास सांगावे व त्यावर स्वतःच्या अनुभवातून कल्पकतेने लेखन करण्यास सांगावे.

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे.


दिवस : ४१ वा.

- **क्षेत्र / कौशल्य** :- लेखन
- **क्षमता :-** वाचन लेखनाचा उद्देश लक्षात घेऊन आपले विचार प्रभावीपणे लिहितात. दिलेल्या विषयावर स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे.
- **संकल्पना :- संवाद लेखन**

जाणून घेऊ या

नदी आणि झाड यांच्यात काय बोलणे चालू असेल?

शिक्षक मुलांना वरील प्रश्नाच्या माध्यमातून बोलते करतील. तसेच गटात, वर्गात, दोन-दोन मुले समोर बोलावून हा संवाद कसा घडत असेल याची प्रत्यक्ष कृती करून घेतील.



नदी आणि झाड या दोघांमधील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.

शिक्षक मुलांकडून हा संवाद लेखन करून घेतील. आणि जाणून घेतील की मुले कशा प्रकारे संवाद लेखन करतात. संवाद लेखनाच्या निकषाचा विचार करून मार्गदर्शन करतील.

सक्षम होऊ या

शिक्षकांनी संवाद लेखनाची संकल्पना अधिक दृढ करण्यासाठी पुढील गोष्टी कराव्यात.

- मुलांनी लिहिलेल्या वरील संवादाचे प्रकट वाचन करण्यास सांगावे.
- संवाद या साहित्य प्रकाराबद्दल माहिती देणे.
- संवादाची विविध प्रकाराची वैशिष्ट्ये सांगावीत
- गटात संवाद लेखनाची चर्चा करावी.
- विद्यार्थ्यांकडून काही कृती सोडवून घ्या.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक संवाद लिहायला सांगावा.त्यात खालील मुद्यांचा विचार व्हावा.

- संवाद कोणा कोणात सुरू आहे, याची स्पष्ट कल्पना लेखनातून यावी.
- संवादांतील दोन व्यक्ती, वस्तू भिन्न स्तरावरील असतील तर त्यानुसार भाषा बदलती असावी.
- संवादातील वाक्ये सोपी, सुटसुटीत, अनौपचारिक असावीत.

सराव करू या

कोविड काळात डॉक्टर पेशंट सोबत काय संवाद सादत असतील तुम्ही कल्पना करून संवाद लेखन करून घेतील.



वरीलप्रमाणे आताच्या काळात घडणाऱ्या विविध घटना प्रसंग याविषयी संवाद लेखन करून घ्यावे.

****

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस : ४२ वा.

- **क्षेत्र /कौशल्य -:**लेखन
- **क्षमता -:** वाचन लेखनाचा उद्देश लक्षात घेऊन आपले विचार प्रभावीपणे लिहितात. दिलेल्या विषयावर स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे.
- **संकल्पना -: संवाद लेखन**

जाणून घेऊ या

एक संवादाचा नमुना शिक्षक देतील त्याचे वाचन करून घेतील व काही प्रश्नावर चर्चा घेतील उदा. दोन मित्र राजू आणि संजू हा संवाद वाचा

राजू : आपल्या फळ्यावरची सूचना वाचली का?
संजू : हो वाचली नं आणि मी त्या कार्यक्रमाला जाणार आहे. मी नावही दिलंय. अरे, तू येतोस नं?
राजू : हे काय विचारणं झालं? माझी तर खूप दिवसांपासून तयारी सुरू आहे.
संजू : तयारी? अन् ती कशी काय?
राजू : अरे! ती सूचना तर आता आली व आत्ता सर्वांना कळले; पण माझी तयारी आधीच झाली.
संजू : कोणती तयारी केलीस रे तू?
राजू : जंगलतोड आणि त्याचे परिणाम हे वारंवार ऐकून माझ्या मनावर इतका परिणाम झाला, की झाडं आपणच लावायची असा मी निश्चय केला. मी खूप रोपे तयार केली. अनेक झाडांच्या बिया गोळा करून ठेवल्यात.
संजू : वा! राजू, तू छान तयारी केलीस. मी तुला हे करायला मदत करीनच; पण माझ्याकडे जेवढ्या बिया आहेत त्यासुद्धा मी घेऊन येणार आहे.
राजू : आपण दोघे मिळून आपल्या परिसरात सुद्धा त्यादिवशी काही झाडं लावू.
संजू : राजू, मला तुझा मित्र असल्याचा अभिमान वाटतो, कारण तू सूद्धा माझ्यासारखाच वृक्षप्रेमी आहेस.

सदर संवादात किती व्यक्ती आहे?

हा संवाद कशाशी संबधित आहे ?

असा एखादा संवाद तुम्हाला लिहिता येईल का?

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक संवाद लिहायला सांगावा

सक्षम होऊया

शिक्षकांनी संवाद लेखनाची संकल्पना मुलांना कितपत समजली हे पाहण्यासाठी मुलांनी लिहिलेल्या संवादावर पुढील गोष्टी कराव्यात.

- मुलांनी लिहिलेल्या वरील संवादाचे प्रकट वाचन करण्यास सांगावे.


- संवाद या साहित्य प्रकाराबद्दल माहिती देणे.
- संवादाची विविध प्रकाराची वैशिष्ट्ये सांगावीत
- गटात संवाद लेखनाची चर्चा करावी.
- विद्यार्थ्यांकडून काही कृती सोडवून घ्या.

आणि मुलांनी लिहिलेले संवाद गटात तसेच वर्गात वाचन करू घेऊन त्याची प्रदर्शनी लावावी.जेणेकरून मुले अधिकाधिक चांगले संवाद लिहू लागतील.

सराव करू या

संवाद लिहा

.







shutterstock.com · 1338788093



बंटी : अरे मित्रा, मी अशा वस्तूचा शोध लावलाय, ज्यामधून आपण बाहेरचं सर्व काही पाहू शकतो.
दिनू : अरे वा! अशी कोणती वस्तू आहे ती?
बंटी : खिडकी.

शिक्षकांनी विविध व्यक्ती ,वस्तू ,प्राणी यांच्यातील संवाद लेखनासाठी द्यावे. उदा.मांजर आणि उंदीर

असे संवाद विद्यार्थांना कुठे वाचले असतील ते विचारून संग्रह करा.

****

दिवस ४३ / ४४ वा.

- **क्षेत्र / कौशल्य** - श्रवण / वाचन / लेखन
- **क्षमता** - विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे. कविता वाचून आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे.
- **संकल्पना** - पद्य.

जाणून घेऊ या -

शिक्षकांनी खालील कवितेप्रमाणे एखादी कविता घेऊन कवितेतील घटकांवर विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. कृती सोडवण्यास सांगून विद्यार्थ्यांचे कवितेविषयी झालेले आकलन जाणून घ्यावे.

उन्हात घामेजुनी अंगाची होतीया लाहीलाही
सूर्यकिरणांची लागती उष्णगरम झळाई
आठवते दग्ध उन्हातील थंडगार सराई
वटवृक्षाच्य सावलीत थाटलेली पाणपोई
रखरखत्या उन्हात सुटतो अवखळ वारा
धुळीसंगे पालापाचोळा जाई उंच अंबरा
थकलेल्या वाटसरुला ग्लानी येती गरागरा
पिऊनी पाण्याचा घोट तेव्हा महत्त्व कळे खरा
या दिवसांत चोहीकडे पडते कडक ऊन
सारखीसारखी लागते साऱ्यांना मोठी तहान
पिण्यास ठेवतात पाण्याने भरलेले रांजण
रंक असो वा राव, हे पाणी पितात सारेजण
झाकलेला लाल कपडा, गार पाणी रांजणात
भरपेट पाणी पिऊनी तृप्त वाटते मनात
धन्य असो ज्याने थाटिली ही पाणपोई उन्हात
पिऊनीया पाणी दुवा देती सारे त्या सज्जनास


- **कृती -**

१) कवितेत कोणत्या ऋतूचे वर्णन केले आहे ?
२) वारा काय करतो ?
३) पाणपोईचे वर्णन करा.
४) उन्हासाठी आलेली विशेषणे लिहा.
५) मन तृप्त केव्हा होते ?
६) सारेजण दुवा कोणाला देतात ?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी वरील कवितेवर विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. कवितेतील घटकांवर आपले विचार व्यक्त करण्याच्या दृष्टीने आणखी एखादी कविता विद्यार्थ्यांना द्यावी. विद्यार्थ्यांनी कविता वाचून आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करावा.



- **कृती -**

१) चिमणी गाव सोडून का आली आहे ?
२) चिमणीच्या डोळ्यांत पाणी का दाटलं आहे ?

सराव करू या –

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कवितेतील घटकांविषयी झालेले आकलन जाणून घेण्यासाठी कृती सोडविण्यास द्याव्यात.

- **कृती -**

१) चिमणीचे संकट दूर करणे कोणाच्या हातात आहे ?
२) पाण्याविना विझतील श्वास घेणारे हे दिवे - या ओळीचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.
३) निसर्ग वाचवण्यासाठी तुम्ही काय काय करू शकता ?

प्रशिक्षण परिषद, पुणे.

दिवस ४५ वा.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे ब्रिज कोर्स चाचणी क्र. ३

विषय: मराठी (द्वितीय भाषा)

इयत्ता 9 वी गुण ३०

विद्यार्थ्याचे नाव : .....

विभाग १ - गद्य

१. उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

मोबाईल फोनने मानवी जीवनात मोठी क्रांती घडवून आणली.भौतिक अंतर मिटवत माणसाला माणसांशी जोडले. अगदी क्षणात जगात कुठेही संपर्क आपण करु शकतो. पण दूरच्या माणसांशी जोडले जात असताना आपण जवळच्या माणसांपासून तर दूर जात नाही ना ? हा प्रश्न स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. मोबाईलमुळे आपली मोठी सोय झाली आहे ; पण या सोयीचे रुपांतर गरजेत आणि गरजेचं रुपांतर व्यसनात होत असेल तर मोठा धोका आहे. खेळाच्या मैदानात तासनतास भान हरवून खेळणारी मुले घरात तहानभूक विसरून मोबाईलच्या जगात हरवली असतील तर त्याचे घातक परिणाम आरोग्यावर होतील.मुले यंत्राच्या सहवासात राहून भावनाशून्य होतील. संवाद विसरतील , जीवनकौशल्य विसरतील. मोबाईलचा वापर योग्य कामासाठी व मर्यादित वेळेपुरता करावा. मोबाईल फोनला स्मार्टफोन असेही म्हणतात , मग त्याचा वापरदेखील स्मार्टपणे करायला नको का ?

प्रश्न.१ अ) उत्तरे लिहा

१. उताऱ्यात आलेला वाक्प्रचार शोधून लिहा. _____ १

२. स्वतःला कोणता प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे ? १

३. मुले यंत्राच्या सहवासात राहून या गोष्टी विसरतील. १

१. ---------- २. ----------

४. मोबाईलचे दुसरे नाव - _____ १

आ) मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे वाईट परिणाम लिहा. २

विभाग २ – पद्य

२. खालील कवितेच्या आधारे खालील कृती सोडवा.

हे मंदिर आमुचे ज्ञानाचे, मानाचे अभिमानाचे
इथेच घडते सुंदर जीवन, माझ्या तुमच्या भाग्याचे
अज्ञानाचा तिमिर सारते, ज्ञानप्रकाशा हृदयी धरते
सरस्वतीच्या पायी माथा, अक्षरलेणे ममतेचे
त्यागाचा संस्कार रुजवते, बालमना हळुवार फुलवते
हीच प्रार्थना करितो सकला, शिखर मिळावे प्रगतीचे
मानवतेचा जपू वारसा, बंधू-भगिनी कुणी न परका
ऐक्याचा संदेश जगाला, बाळकडू ते समतेचे

कवी - राजेंद्र सोमवंशी

१. दिलेल्या शब्दांसाठी समानार्थी शब्द कवितेतून शोधून लिहा. १

१. देऊळ ---------- २. डोके ----------

२. कवितेत कोणत्या ठिकाणाचे वर्णन केले आहे ? १

३. चौकट पूर्ण करा. १

संस्कार -

संदेश -

४. कवी कोणासाठी व कोणती प्रार्थना करत आहे? १

५. **ओळींचा अर्थ लिहा.** २

मानवतेचा जपू वारसा
बंधू-भगिनी कुणी न परका

विभाग ३- स्थूलवाचन

प्रश्न ३. दिलेले शब्द अकारविल्हे प्रमाणे लावा. ३

आमरण , पांडुरंग, जनता, संत, इमान, विविध , क्षमता , चर्चा, अनेक, बातमी, नमन, हिरवळ

विभाग ४- भाषाभ्यास

प्रश्न ४ अ) दिलेल्या शब्दांचे दोन अर्थ लिहा. २

१. मान - २. पान -

आ) अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा. १

बागेमध्ये उमललेल्या गुलाबाच्या फुलावर फुलपाखरू हळुवार बसले.

विभाग ५ -उपयोजित लेखन

प्रश्न ५ अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. ८

१. आकाश व जमीन या दोघांमधील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.
२. शाळेने आयोजित केलेल्या उन्हाळी शिबिरात सहभागी होण्यासाठी विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा.
३. शाळेत साजऱ्या झालेल्या शिक्षकदिनाची बातमी लिहा.

आ) दिलेल्या मुद्द्यांवरुन कथा लिहा. ४

एक मुलगा-- रोज पानात अन्न टाकणे-- घरातील सर्वांनी समजावणे -- उपयोग न होणे -- आईने एक दिवस गरिबांच्या वस्तीत नेणे -- तेथील मुलांचे जेवण पाहाणे -- समज येणे

****

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व